साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २७.०८.२०२६ | अंक नं. १२६ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

तुमच्या बॉन बेबीची काळजी तुमच्याप्रमाणे आम्हालाही
नवजात बाळासाठी सर्व काही इथेच...
आता पुण्यात सुद्धा..
। स्वेटर । जॅकेट । झबले । टोपी । लंगोट । गादी ।
। मच्छरदाणी । बंडी । कॅप । टॉवेल । कपाट ।
। प्लास्टीक ड्रायशिट । सॉक्स । हातमोजे व बरेच काही.
जरीवाला
कापड बाजार, नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

सुवर्णबंध हे बहिण-भावाच्या नात्याचे..
खास रक्षाबंधनानिमित्त सोन्या-चांदीच्या राख्या आकर्षक पॅकिंगमध्ये उपलब्ध.
सोन्याची राखी - ₹ 999/- पासुन
चांदीची राखी - ₹ 199/- पासुन
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
₹999/-*
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी

## खा. नीलेश लंकेंचे १ सप्टेंबरपासून उपोषण

### शिक्षकांची रिक्त पदे भरण्याची मागणी; जिल्हा परिषद प्रशासनाला ३१ ऑगस्टपर्यंत मुदत; २५२५ पदे रिक्त असल्याचा दावा



नगर - जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत, शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता भार कमी करावा आणि शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान थांबवावे, या मागणीसाठी खासदार नीलेश ज्ञानदेव लंके यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या मागण्यांवर ३१ ऑगस्टपर्यंत ठोस निर्णय व लेखी कृती आराखडा न मिळाल्यास १ सप्टेंबर पासून जिल्हा परिषद आवारात उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

खासदार लंके यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना दिलेल्या पत्रात जिल्ह्यातील शिक्षकांच्या रिक्त पदांचा प्रश्न गंभीर असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. उपलब्ध अधिकृत आकडेवारीनुसार प्राथमिक व पदवीधर शिक्षक संवर्गातील ४७१, तर माध्यमिक विभागातील २ हजार ५४ पदे अशी एकूण २ हजार ५२५ शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. प्रत्येक शिक्षकामागे २० विद्यार्थी गृहीत धरल्यास सुमारे ५० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर याचा परिणाम होत असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

एकीकडे हजारो शिक्षकांची पदे रिक्त असताना कार्यरत शिक्षकांनाच अध्यापनाव्यतिरिक्त विविध अशैक्षणिक कामे करावी लागत असल्याकडे लंके यांनी लक्ष वेधले आहे. बीएलओ ड्युटी व मतदार यादी पुनरिक्षण, जनगणना व विविध शासकीय सर्वेक्षणे, ऑनलाइन पोर्टलवर माहिती भरणे, विद्यार्थ्यांचे आधार कार्ड व बँक खाती, पोषण आहार, एफएसएसएआय नोंदणी, आरोग्यविषयक नोंदी तसेच विविध योजनांचे अहवाल व ऑनलाइन कामे शिक्षकांवर सोपविली जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

शिक्षकांचा अध्यापनाचा वेळ अशा कामांमध्ये खर्च होत असल्यास विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे मिळणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. शिक्षकांचा प्रश्न हा केवळ कर्मचारीविषयक प्रश्न नसून तो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी थेट संबंधित असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शिक्षकांची हजारो पदे रिक्त असताना ती भरण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली, आवश्यक प्रस्ताव व पाठपुरावा वेळेत का करण्यात आला नाही, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीची जबाबदारी कोणाची, तसेच कार्यरत शिक्षकांवर पडलेल्या अतिरिक्त कामाच्या भाराची जबाबदारी कोणाची, असे प्रश्न लंके यांनी उपस्थित केले आहेत. शिक्षकांचा प्रत्यक्ष अध्यापनाचा वेळ आणि अशैक्षणिक कामांसाठी जाणारा वेळ याचा प्रशासनाने आढावा घेतला आहे का, याबाबतही त्यांनी खुलासा मागितला आहे.

जिल्ह्यातील सर्व रिक्त शिक्षक पदे तातडीने भरण्यासाठी अंतिम मुदतीसह कालबद्ध कृती आराखडा जाहीर करावा. प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील रिक्त पदांची शाळानिहाय, विषयानिहाय व संवर्गनिहाय अंतिम यादी जाहीर करावी. रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान व कार्यरत शिक्षकांवरील अतिरिक्त भाराचा तालुकानिहाय आढावा घेऊन लेखी खुलासा द्यावा, अशी मागणी लंके यांनी केली आहे. तसेच शिक्षकांना अध्यापनाशी थेट संबंध नसलेल्या अशैक्षणिक कामांपासून मुक्त करावे, अत्यावश्यक शासकीय कामांसाठी पर्यायी प्रशासकीय व्यवस्था निर्माण करावी आणि शिक्षकांची कमतरता असलेल्या शाळांमध्ये तात्पुरती शिक्षक व्यवस्था करून विद्यार्थ्यांचे नुकसान तातडीने थांबवावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. या प्रश्नावर प्रशासनाने अपेक्षित गांभीर्याने कार्यवाही न केल्याने आंदोलनाचा निर्णय घेतल्याचे खासदार लंके यांनी पत्रात नमूद केले आहे.

३१ ऑगस्टपर्यंत ठोस निर्णय व लेखी कृती आराखडा न मिळाल्यास १ सप्टेंबरपासून जिल्हा परिषद आवारात उपोषण करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

## देशामध्ये 'स्वाइन फ्लू' चा फैलाव; महाराष्ट्रासह विविध राज्यांतही रुग्ण

### भारतीय वैद्यकीय संघटनेकडून सार्वजनिक आरोग्यविषयक मार्गदर्शक तत्त्वे जारी

नवी दिल्ली - देशात सक्रीय मान्सूनमुळे महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्ये 'इन्फ्लुएन्झा ए' (एच१एन१) अर्थात स्वाइन फ्लूच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि पश्चिम बंगालमध्ये संसर्गाचे रुग्ण आढळले असून, दिल्लीत स्वाइन फ्लू, इन्फ्लुएन्झा ए आणि बीचे एकूण रुग्ण तीन हजारांपार गेले आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय वैद्यकीय संघटनेने (आयएमए) सार्वजनिक आरोग्यविषयक मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. यानुसार बाजारपेठा, गर्दीची ठिकाणे आणि सार्वजनिक वाहतुकीच्या ठिकाणी मास्क वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

नागरिकांनी घाबरून जाण्याची गरज नसली, तरी संसर्गापासून बचावासाठी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन करत, 'आयएमए'चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अनिलकुमार जे. नायक आणि मानद सरचिटणीस डॉ. सरबरी दत्ता यांनी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

'एच१एन१'मुळे होणारे बहुतांश संसर्ग सौम्य स्वरूपाचे असतात आणि वेळेनुसार रुग्ण बरे होतात. मात्र, काही रुग्णांमध्ये संसर्ग गंभीर स्वरूप धारण करू शकतो. त्यामुळे ताप येणे, थंडी वाजणे, सतत कोरडा खोकला, घशात खवखव किंवा दुखणे, स्नायूंमध्ये तीव्र वेदना आणि प्रचंड थकवा यांसारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. मुलांमध्ये मळमळ, उलट्या किंवा जुलाब होण्याचे प्रमाण तुलनेने अधिक असू शकते. स्वाइन फ्लूची लक्षणे आढळल्यानंतर नागरिकांनी स्वतःहून प्रतिजैविके किंवा तापावरील औषधे न घेण्याचा सल्ला 'आयएमए'ने दिला आहे.

हा विषाणूजन्य आजार असल्याने त्यावर प्रतिजैविकांचा कोणताही परिणाम होत नाही. त्यामुळे झिथ्रोमायसिन, मॉक्सिसिलिन- क्लॅव्ह्युलेनेट, सेफिक्सिम किंवा अन्य कोणतीही प्रतिजैविके किंवा ओसेल्टामिव्हिरसारखी औषधे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेऊ नयेत. संसर्ग गंभीर होण्याची काही लक्षणे दिसल्यास तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी. श्वास घेण्यास त्रास होणे, धाप लागणे किंवा वेगाने श्वास घेणे, छातीत दुखणे किंवा सतत दाब जाणवणे, ओठ अथवा बोटे निळी पडणे, खोकल्यातून रक्त येणे किंवा जास्त झोप येणे यांसारखी लक्षणे दिसल्यास, तसेच सतत उलट्या किंवा तोंडावाटे द्रवपदार्थही घेता न येणे अशा परिस्थितीत त्वरित रुग्णालयात दाखल होणे आवश्यक असल्याचेही संघटनेने म्हटले आहे. आरोग्य कर्मचारी, गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरिक आणि गंभीर अथवा दीर्घकालीन आजार असलेल्या व्यक्तींना दरवर्षी हंगामी इन्फ्लुएन्झाची लस घेण्याचा सल्लाही 'आयएमए'कडून देण्यात आला आहे.

## जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्येही आता स्वीकृत सदस्य

### ग्रामविकास विभागाची अधिसूचना जारी, राजकीय पक्षांच्या संख्याबळानुसार होणार निवड

मुंबई - महापालिका आणि नगरपालिकांप्रमाणे आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही स्वीकृत अर्थात नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करता येणार आहे. ग्रामविकास विभागाने यासंदर्भातील अधिसूचना जारी केल्याने नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे.

संबंधित पक्षांच्या संख्याबळानुसार या सदस्यांची निवड केली जाणार असून, त्यामुळे स्थानिक पातळीवरील राजकीय कार्यकर्त्यांना संधी मिळणार आहे. राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये तब्बल १ हजार ५ नामनिर्देशित सदस्यांची भर पडणार आहे.

'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक,२०२६' यापूर्वीच विधानसभेत मंजूर झाले आहे. त्यानंतर ग्रामविकास विभागाने अधिसूचना जारी केल्याने स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यातील ३४ जिल्हा परिषदांमध्ये सध्या २ हजार २१० निर्वाचित सदस्य आहेत. आता त्यासोबत २०१ स्वीकृत सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे. जिल्हा परिषदेत एकूण निर्वाचित सदस्यसंख्येच्या १० टक्के किंवा किमान ५ सदस्य, यापैकी लागू असलेल्या मर्यादेनुसार नामनिर्देशित सदस्य नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे राज्यातील ३०१ पंचायत समित्यांमधील ४ हजार २४ निर्वाचित सदस्यांच्या संख्येत आता ८०४ नामनिर्देशित सदस्यांची भर पडणार आहे. पंचायत समितीमध्ये एकूण सदस्यसंख्येच्या २० टक्के किंवा किमान १ सदस्य नियुक्त करण्याची तरतूद आहे.

स्वीकृत सदस्य म्हणून केवळ राजकीय कार्यकर्त्यांनाच संधी मिळणार नाही, तर संबंधित क्षेत्रातील अनुभव आणि ज्ञान असलेल्या व्यक्तींनाही प्रतिनिधित्व मिळू शकते. वकील, शिक्षक, प्राध्यापक, समाजसेवक तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात सहभागी करून घेण्याचा उद्देश आहे.

या सदस्यांकडून जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या प्रशासकीय कामकाजात सल्ला, तांत्रिक मार्गदर्शन आणि संबंधित क्षेत्रातील अनुभवाचा उपयोग करून घेता येणार आहे. त्यामुळे स्थानिक विकासकामांमध्ये तज्ज्ञ व्यक्तींचा सहभाग वाढण्याची शक्यता आहे.

स्वीकृत सदस्यांच्या नामनिर्देशनासाठी जिल्हाधिकारी मान्यताप्राप्त पक्ष तसेच नोंदणीकृत पक्ष आणि गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेतील. संबंधित पक्ष किंवा गटाच्या नेत्याशी विचारविनिमय करून त्यांच्या सभागृहातील संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन केले जाणार आहे.

यासाठी संबंधित पक्ष आणि गटांना जिल्हाधिकाऱ्यांकडे गटनोंदणी करावी लागणार आहे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये आता गटनोंदणी तसेच नामनिर्देशनाच्या प्रक्रियेला वेग येण्याची शक्यता आहे.

### स्वीकृत सदस्यांना कोणते अधिकार असतील?

नामनिर्देशित सदस्यांना जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या प्रशासकीय कामकाजात सहभागी होता येणार असले तरी त्यांच्या अधिकारांवर काही मर्यादा असतील. त्यांना सभेतील प्रस्तावांवर मतदान करता येणार नाही. तसेच स्वीकृत सदस्यांना जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीतील अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती किंवा उपसभापती यांसारख्या पदांच्या निवडणुकीत पात्र ठरता येणार नाही. त्यामुळे या सदस्यांना सभागृहात मार्गदर्शन आणि सहभागाची भूमिका बजावता येईल; मात्र निर्णय प्रक्रियेत मतदानाचा अधिकार मिळणार नाही.

विनम्र अभिवादन!
बाबा..
कै.प्रकाश लक्ष्मण कुलकर्णी
आपल्या जन्म जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!
"एक वेळ बापाचं असण जाणवत नाही.. पण नसणं क्षणाक्षणाला जाणवतं.."
: आपले नम्र :
श्रीमती नलिनी प्रकाश कुलकर्णी (पत्नी)
श्रीमती जयंती लक्ष्मण कुलकर्णी (मोठी बहीण)
श्रीमती मीनाक्षी लक्ष्मण कुलकर्णी (लहान बहीण)
श्री. तपस प्रकाश कुलकर्णी (मुलगा)
समस्त कुलकर्णी परिवार (मो : 9657754696)

## अनेक जिल्ह्यात यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस

पुणे - राज्याच्या बहुतांश जिल्ह्यात जुलैमध्ये जोरदार बरसलेल्या पावसाने जून-जुलैची सरासरी भरून काढली, मात्र ऑगस्ट महिन्याचा शेवटचा आठवडा उजाडला तरी पावसाने ओढ दिल्याने सातारा, नाशिक वगळता इतर कोणताही जिल्हा महिन्याची सरासरी गाठू शकलेला नाही. ऑगस्ट महिन्यात यंदा महाराष्ट्रात सरासरीच्या तुलनेत ५४ टक्के कमी पाऊस नोंदवला गेला आहे.

भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या आकडेवारीनुसार पुणे जिल्ह्यात १ ते २६ ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्यात १८१ तर शहरात ७६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्याच्या सरासरीच्या तुलनेत २३ टक्के कमी पाऊस नोंदवला गेला आहे. पावसाचा जोर वाढण्यास अपेक्षित असलेले वातावरणच गेल्या महिनाभरात तयार झाले नाही. त्यामुळे मध्य महाराष्ट्रातील काही जिल्हे वगळता, इतरत्र पाऊस पडला नाही.

### कमी पाऊस पडलेले जिल्हे (टक्क्यांमध्ये)

अकोला (-८५) बीड (-८५) वर्धा (-८४) अमरावती (-८६) यवतमाळ (-७९) सोलापूर (-७७) नागपूर (-७४) अहिल्यानगर (-७४) धाराशिव (-७३) हिंगोली (-७१) वाशीम (-६८) परभणी (- ६७) चंद्रपूर (-६४) नांदेड (-६०) बुलढाणा (- ५९) लातूर (-५२) छत्रपती संभाजीनगर (-४६) पालघर (४३) मुंबई (-३५) ठाणे (-३२) सांगली (-३२) रायगड (-३०) रत्नागिरी (-२५) गोंदिया (-२५) सिंधुदुर्ग (-२४) पुणे (-२३)

## किराणा दुकानाचे कुलूप तोडून ९९ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास

नगर - केडगाव बायपास परिसरातील श्री स्वामी समर्थ किराणा अँड जनरल स्टोअर्स हे दुकान अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री फोडून दुकानातील रोकडसह तब्बल ९९ हजार रुपयांचा माल लंपास केला. ही घटना २६ ऑगस्ट रोजी मध्यरात्री पावणेदोन वाजेच्या सुमारास घडली असून या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

केडगाव येथील वेअर हाऊस गोदामाजवळ राहणारे व्यावसायिक गोरक्षनाथ रंगनाथ लोंढे (वय ४४) यांचे केडगाव बायपास रोडवर किराणा दुकान आहे. २६ ऑगस्ट रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी दुकानाच्या शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी दुकानातील गल्ल्यात ठेवलेली २० हजार रुपयांची रोकड, ५० हजार रुपये किमतीची सिगारेटची पाकिटे, ५ हजार रुपयांचा सुकामेवा (काजू, बदाम, मनुके), १० हजार रुपयांची ऊर्जा पेये (एनर्जी ड्रिंक्स), २ हजार रुपयांचे चॉकलेट-बिस्किटे, १० हजार रुपयांचे तांदूळ, तूरडाळ, बेसन असे किराणा सामान आणि २ हजार रुपयांचे लेखन साहित्य (वह्या, पेन) असा एकूण ९९ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. सकाळी चोरीचा हा प्रकार उघडकीस आल्यानंतर दुकानदार गोरक्षनाथ लोंढे यांनी तत्काळ कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली.

विद्यार्थी प्रवेश देणे सुरु!
महाराष्ट्र शासनाने स्थापिलेले
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकच्या
योग शिक्षक पदविका (P-126)
शिक्षणक्रमाचे मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्र
* शिक्षणक्रमाची वैशिष्ट्ये :
१) सर्व महिला-पुरुष व खेळाडू, फिजिओथेरपिस्ट, डॉक्टर्स, शारीरिक शिक्षक, क्रीडाप्रशिक्षक, महिला आरोग्यसेवक, प्राथमिक-माध्यमिक शिक्षक, यांना प्रवेशासाठी प्राधान्य. २) योगशास्त्राचे शास्त्रीय प्रशिक्षण घेऊन स्वतंत्रपणे योगासन प्राणायामाचे वर्ग चालवता येतील. ३) समाजाच्या शारीरिक व मानसिक आरोग्य संवर्धनासाठी योगाचा प्रचार व प्रसार करता येईल. ४) योगात संशोधनाची संधी
* शिक्षणक्रमाचा कालावधी :- १ वर्ष * फक्त रविवारी सकाळी १० ते सायं. ४ वा.
* प्रवेश पात्रता :-
१) इ. १२वी प्रमाणपत्र व गुणपत्रक २) महिलांसाठी (विवाहित असल्यास) विवाह प्रमाणपत्र किंवा गॅझेट आवश्यक. ३) आधार कार्ड ४) मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट ५) ABC सर्टिफिकेट नंबर, सर्व कागदपत्रे मूळ प्रती आवश्यक. किंवा शाळा सोडल्याचा दाखला ज्यानावाने आहे त्या नावाने ॲडमिशन मिळेल.
योग विद्याधाम
ऑनलाईन प्रवेश उपलब्ध
प्रवेश प्रक्रिया ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत
एम.ए. योगशास्त्र या अभ्यासक्रमासाठी सुद्धा प्रवेश सुरु होत आहेत.
प्रवेश मर्यादीत : - संपर्क : हेमंत आयचित्ते : ९४०५०००६८०.
अडाणे सर : ९८२३७८१२४६, जयंत वेसीकर : ७३८७४४२२८८
Mail ID - yogvidyadhamahmednagar@gmail.com
(योग विद्याधाम अहमदनगर सेंटर कोड नंबर ५११११२)
ऑनलाईन अर्जासाठी लिंक : http://ycmouoa.digitaluniversity.ac/index.htm
ऑफिस (१) : योग विद्याधाम, चिंतामणी कॉलनी, भिस्तबाग रोड, ज्ञानेश्वर मोटार ड्रायव्हिंग स्कूल मागे, सावेडी, अ.नगर.०२४१-२४२१२५५.
ऑफिस (२) : योग विद्याधाम, खलीपा तालीमच्यावर, सिद्धीबाग, अ.नगर. फोन : ०२४१ - २३२५५९४.

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
एकाच छताखाली हजारो स्टाईल्सची निवड!
पुरुष । महिला । मुलांसाठी
प्रत्येक प्रसंगासाठी योग्य, आरामदायी आणि ट्रेंडी फुटवेअर
पुरुषांसाठी | महिलांसाठी | मुलांसाठी
उपलब्ध नामांकित ब्रॅण्ड्स
adidas NIKE PUMA Reebok SKECHERS asics campus sparx ABROS Bata RELAXO Paragon crocs Hush Puppies RED TAPE WOODLAND WILDCRAFT CONVERSE KOLHAPURI मोजडी
१००% ओरिजनल ब्रॅण्डस | उत्तम क्वॉलिटी | वाजवी दर | संपूर्ण कुटुंबासाठी
आपल्या संपूर्ण कुटुंबासाठी फुटवेअरची परिपूर्ण शॉपिंग!
एम.जी.रोड, कापड बाजार, अहिल्यानगर
आजच भेट द्या !
एकदा या.. पुन्हा याल!
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE शू पॅलेस
सारडागल्ली, अ.नगर, मो : 9881531536

# गृहिणी

## आरोग्य

### पोट ठेवा निरोगी

आजकालच्या धावपळीच्या आणि बदलत्या जीवनशैलीमुळे पोटाच्या समस्या खूप सामान्य झाल्या आहेत. अपचन, गॅस, पोटफुगी किंवा बद्धकोष्ठता यांसारख्या तक्रारी अनेकांना वारंवार सतावतात. अनियमित जेवणाच्या वेळा, बाहेरचे तेलकट-तिखट अन्न खाणे आणि पुरेशी झोप न मिळणे यामुळे आपली पचनशक्ती मंदावते. पोटाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी आणि पचनाशी संबंधित समस्या दूर करण्यासाठी काही सोपे आणि प्रभावी उपाय आपण घरातल्या घरात करू शकतो. पचनक्रिया सुधारण्यासाठी ओवा आणि सैंधव मीठ अत्यंत गुणकारी मानले जाते. अर्धा चमचा ओवा आणि चिमूटभर सैंधव मीठ कोमट पाण्यासोबत घेतल्यास गॅस आणि अपचनाचा त्रास पटकन कमी होतो. तसेच, जेवणापूर्वी आल्याचा छोटा तुकडा आणि थोडे मीठ चावून खाल्ल्याने भूक वाढते आणि खाल्लेले अन्न व्यवस्थित पचण्यास मदत होते. दुपारच्या जेवणानंतर जिरेपूड आणि कोथिंबीर घातलेले ताक पिणे देखील पोटासाठी खूप फायदेशीर ठरते. तासामुळे पोटाला थंडावा मिळतो आणि पचनक्रिया सुरळीत चालते. या उपायांसोबतच आपल्या काही सवयींमध्ये बदल करणे गरजेचे आहे. दिवसभरात भरपूर पाणी पिणे आरोग्यासाठी आवश्यक आहे. पाणी कमी प्यायल्याने बद्धकोष्ठतेची समस्या बळावू शकते, म्हणून किमान तीन ते चार लिटर पाणी पिण्याची सवय ठेवावी. जेवताना नेहमी घाई न करता अन्नाचा प्रत्येक घास चांगला चावून खावा, जेणेकरून लाळ अन्नात व्यवस्थित मिसळून पचन सुलभ होईल. रात्रीचे जेवण नेहमी हलके असावे आणि झोपण्यापूर्वी किमान दोन ते तीन तास आधी जेवावे. जेवल्यानंतर लगेच झोपण्याऐवजी दहा ते पंधरा मिनिटे संथ गतीने चालल्यास खाल्लेले अन्न सहज पचते. पोटाच्या तक्रारींकडे दुर्लक्ष न करता योग्य आहार आणि चांगल्या सवयी अंगीकारल्या, तर पोट कायम निरोगी राहू शकते.

## पाककला

### चॉकलेट श्रीखंड

**साहित्य :** चक्का २ वाटी, डार्क चॉकलेट किसलेले १/२ वाटी, पिठीसाखर ३/४ वाटी, कोको पावडर १ चमचा, फ्रेश क्रीम २ चमचे, व्हॅनिला इसेन्स १/४ चमचा, चॉकलेट चिप्स १ चमचा, सजावटीसाठी बारीक चिरलेले काजू बदाम १ चमचा

**कृती :** प्रथम चक्का एका मोठ्या भांड्यात घ्या. त्यात पिठीसाखर घालून एकजीव होईपर्यंत फेटून घ्या. त्यात कोको पावडर, फ्रेश क्रीम आणि व्हॅनिला इसेन्स घालून मिश्रण एकजीव करा. डार्क चॉकलेट डबल बॉयलरवर वितळवून घ्या. वितळलेले चॉकलेट थोडे कोमट झाल्यावर चक्क्याच्या मिश्रणात घालून चांगले मिक्स करा. त्यात चॉकलेट चिप्स घाला. तयार श्रीखंड २ तास फ्रीजमध्ये थंड होण्यासाठी ठेवा. तयार चॉकलेट श्रीखंडावर बारीक चिरलेले काजू बदाम आणि चॉकलेट चिप्स घालून थंड सर्व्ह करा.

## वास्तू

### गृहप्रवेशासंबंधी

नवीन घरात प्रवेश करताना किंवा जुन्या घरात काही मोठे नूतनीकरण केल्यावर वास्तूशांती विधी करणे अतिशय शुभ आणि महत्त्वाचे मानले जाते. या विधीमुळे घरातील नकारात्मक ऊर्जा नष्ट होऊन सकारात्मक ऊर्जेचा संचार होतो आणि कुटुंबाला सुख, समृद्धी लाभते. घरात प्रवेश करताना घराच्या मुख्य स्त्रीने (गृहिणीने) उंबरठ्यावर लक्ष्मीचे पाऊल उमटवून किंवा कलश हातात धरून प्रवेश करणे शुभ मानले जाते. वास्तूशांतीच्या दिवशी स्वयंपाकघरात पहिली गोष्ट म्हणजे दूध उकळणे किंवा गोड पदार्थ (उदा. खीर) बनवून देवाचा नैवेद्य दाखवतात.

## सौंदर्य

नेहमी ३ भाग गुलाब जल आणि १ भाग ग्लिसरीन असे प्रमाण ठेवावे. उदा. जर तुम्ही ३ चमचे गुलाब जल घेतले असेल, तर त्यात फक्त १ चमचा ग्लिसरीन मिसळावे. ग्लिसरीन खूप घट्ट असते, त्यामुळे जास्त प्रमाणात वापरल्यास त्वचा चिकट वाटू शकते. हे मिश्रण फक्त चेहऱ्यासाठीच नाही, तर हात-पायांच्या कोरड्या त्वचेसाठीही उत्तम 'बॉडी लोशन' म्हणून वापरता येते.

## सल्ला

कांदा लवकर आणि चांगला परतायचा असेल, तर त्यात चिमूटभर मीठ आणि साखर घालावी.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६

**रक्षाबंधन, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, शततारा २७।१३, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आर्थिक लाभ होणार आहे. सामाजिक दर्जा वाढेल.

**वृषभ :** संघर्ष टळणार नाही. शत्रू सक्रिय राहणार आहेत.

**मिथुन :** नफा मिळणार आहे. संयम ठेवावा कामे टाळली जाणार आहेत.

**कर्क :** प्रतिष्ठा वाढणार आहे. शत्रूंचा पराभव होणार आहे.

**सिंह :** प्रतिष्ठेत वाढ होणार आहे. खर्च वाढणार आहे.

**कन्या :** आर्थिक स्थिती मजबूत होणार असून कामे सुरळीत पार पडतील.

**तूळ :** मित्रांचे सहकार्य लाभेल. प्रवास फायदेशीर ठरेल.

**वृशिक :** आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. खर्च वाढेल.

**धनु :** गुंतवणुकीतून नफा होईल. विद्यार्थी अभ्यासात लक्ष केंद्रित करतील.

**मकर :** नफ्याचे नवीन मार्ग उघडणार आहेत. आर्थिक स्थिती मजबूत होतील.

**कुंभ :** व्यवसायात फायदेशीर संधी निर्माण होणार आहेत.

**मीन :** घाईघाईने निर्णय घेणे टाळले जाणार आहे.

# फिल्मीचक्कर क्र. १२५१

सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ■ | ४ | ५ |
| | ■ | | ■ | ६ | | | |
| | ■ | | ■ | | ■ | | ■ |
| ७ | | ■ | ८ | | | ■ | ९ |
| | ■ | १० | ■ | | ■ | ११ | |
| १२ | | | १३ | ■ | १४ | | |
| ■ | ■ | ■ | | ■ | | ■ | ■ |
| १५ | | | | | | | |

**आडवे शब्द :-** १) रितेश व जेनेलिया देशमुख यांचा एक मराठी चित्रपट ४) 'एक जगह जब जमा हो तीनों' ('अमर अकबर अँथनी'मधील गाण्याचे बोल) ६) 'श्यामची आई' चित्रपटात 'श्याम'च्या आईची भूमिका करणारी दिवंगत अभिनेत्री ७) 'एक दूजे के लिए' चित्रपटाची नायिका ८) एक मराठी अभिनेत्री +++ खानविलकर ११) साला मै तो ++ बन गया ('राजा हिन्दुस्तानी'तील गाणे) १२) 'लिखे जो खत तुझे' हे गाणे असलेला शशी कपूरचा चित्रपट १४) +++ उडी ऊड जो चली (सूरज चित्रपटातील गाणे) १५) दादा कोंडके, उषा चव्हाण यांचा गाजलेला एक मराठी चित्रपट

**उभे शब्द :-** १) संजीवकुमार, कुमकुम यांचा एक हिंदी चित्रपट २) धर्मेंद्र, आशा पारेख, संजीवकुमार, हेलन यांचा एक चित्रपट ३) धर्मेंद्र, राखी, जीवन, अजित, राजेंद्रनाथ यांचा एक चित्रपट ४) मिथुन चक्रवर्ती, झीनत अमान यांचा एक चित्रपट ५) ++ सिन्हा (जुन्या काळातील एक अभिनेत्री) ९) बंटी और +++ (चित्रपटाचे नाव) १०) विनोद मेहरा, बिंदिया गोस्वामी, अमजदखान यात आहेत ११) ++ हिन्दुस्तानी (चित्रपटाचे नाव) १३) +++ गरम (चित्रपटाचे नाव) १४) राजकुमार, नाना पाटेकर, ममता कुलकर्णी, वर्षा उसगावकर यांचा चित्रपट

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** प्रयत्नांची उंची इतकी वाढवा की, नशिबाने सुद्धा तुम्हाला हरवण्याऐवजी तुमची साथ देणं पसंत केलं पाहिजे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### भिंतीवर पडणारी सावली नेहमी काळीच का असते?

आपण जेव्हा उन्हात उभे राहतो किंवा घरातील दिव्याखाली आपली सावली जमिनीवर किंवा भिंतीवर पडताना पाहतो, तेव्हा आपल्या मनात हा प्रश्न नक्कीच येतो की ही सावली नेहमी काळीच का बरं असते? आपल्या अंगावर सुंदर, लाल, हिरवे, पिवळे कितीतरी रंगीबेरंगी कपडे असतात, आजूबाजूला निसर्गात विविध रंग असतात, मग पडद्यावर किंवा जमिनीवर पडणारी सावली नेहमी काळी किंवा करड्या रंगाचीच का दिसते? यामागचे विज्ञान अतिशय गमतीशीर आणि रंजक आहे.

हे समजून घेण्यासाठी आपल्याला सगळ्यात आधी प्रकाशाचा स्वभाव समजून घ्यावा लागेल. प्रकाश हा नेहमी सरळ रेषेत प्रवास करतो. सूर्य असो, आकाशातील तारे असोत, घरातील ट्यूबलाईट असो किंवा हातात धरलेली टॉर्च असो, या सर्व प्रकाश स्रोतांमधून निघणारे प्रकाशाचे किरण सरळ रेषेत पुढे जात असतात. जोपर्यंत या प्रकाशाच्या वाटेत काही येत नाही, तोपर्यंत तो अविरत पुढे जात राहतो.

परंतु, जेव्हा या सरळ रेषेत जाणाऱ्या प्रकाशाच्या मार्गात एखादी अपारदर्शक वस्तू येते, तेव्हा खरी गंमत सुरू होते. अपारदर्शक वस्तू म्हणजे अशी वस्तू जिला प्रकाश पार करून पलीकडे जाऊ शकत नाही; जसे की आपले शरीर, झाड, चेंडू किंवा घर. जेव्हा प्रकाश अशा वस्तूंवर पडतो, तेव्हा वस्तूचा जो भाग प्रकाशाच्या दिशेने असतो, तिथे लख्ख प्रकाश पडतो आणि ती वस्तू आपल्याला स्पष्ट दिसते. पण अडचण अशी होते की, त्या वस्तूच्या पलीकडचा भाग झाकला जातो. वस्तू स्वतः प्रकाश अडवून धरते आणि प्रकाश तिच्या आरपार जाऊ शकत नाही.

आता वस्तूने अडवलेला प्रकाश त्या वस्तूच्या अगदी मागे पोहोचू शकत नाही. वस्तूच्या मागे प्रकाशाचा अभाव तयार होतो, म्हणजेच तिथे अंधाराची छोटीशी जागा तयार होते. या अंधाराच्या जागेलाच आपण 'सावली' असे म्हणतो.

सावली ही मूळची कोणतीही वस्तू किंवा पदार्थ नाही, तर ती प्रकाशाची पूर्ण किंवा अपूर्ण अनुपस्थिती असते. जेव्हा आपल्या अंगावर प्रकाश पडतो, तेव्हा आपल्या शरीराचा आकार त्या प्रकाशाला अडवून धरतो. आपल्या शरीरामागे जमिनीवर किंवा भिंतीवर प्रकाश पोहोचत नाही, तिथे प्रकाश नसल्यामुळे अंधार तयार होतो. हा अंधार ज्या आकाराचा असतो, त्याला आपण सावली म्हणतो.

आता सर्वात महत्त्वाचा प्रश्न उरतो की ती काळीच का दिसते? आपल्या डोळ्यांना रंग पाहण्यासाठी प्रकाशाची गरज असते. जिथे प्रकाश अजिबात पोहोचत नाही, तिथे कोणताही रंग परावर्तित होत नाही. जिथे प्रकाशाचा किरणच नाही, तिथे आपल्याला कोणताही रंग दिसू शकत नाही. प्रकाशाच्या अनुपस्थितीला किंवा अभावाला आपण अंधार म्हणतो आणि अंधाराचा कोणताही स्वतःचा रंग नसतो, पण तो आपल्याला नेहमी काळाच भासतो.

याचाच अर्थ असा की, सावली हा कसलाही रंग नसलेला प्रकार आहे, तर तो प्रकाशाचा खेळ आहे. सावली म्हणजे प्रकाशाचा अंधारलेला भाग. प्रकाश नसेल तिथे फक्त अंधार दिसतो आणि अंधाराचा रंग काळा असतो, म्हणून भिंतीवर किंवा जमिनीवर पडणारी सावली नेहमी काळीच दिसते.

### सत्याचा विजय

एका सुंदर गावात राहुल नावाचा एक गरीब पण अत्यंत हुशार आणि प्रामाणिक मुलगा राहत होता. तो गावातीलच एका जिल्हा परिषद शाळेत चौथ्या इयत्तेत शिकत होता. त्याचे शिक्षक त्याला खूप मानत, कारण राहुल अभ्यासात जसा हुशार होता, तसाच तो स्वभावानेही सरळ आणि निष्पाप होता.

एकदा शाळेत विज्ञान प्रयोगाचा तास होता. गुरुजींनी मुलांना काही मौल्यवान काचेची उपकरणे दाखवण्यासाठी आणली होती. तास संपल्यावर गुरुजींनी ती उपकरणे काळजीपूर्वक कपाटात ठेवायला सांगितली आणि ते मुख्याध्यापकांच्या मिटिंगसाठी बाहेर निघून गेले. सर्व मुले आपापल्या दप्तरांमध्ये पुस्तके भरू लागली. इतक्यात राहुलच्या वर्गमित्राने त्याला खेळण्यासाठी हाक मारली. घाईघाईत दप्तर पाठीवर घेत असताना राहुलच्या हाताचा जोरदार धक्का बाजूच्या टेबलवर ठेवलेल्या एका काचेच्या उपकरणाला लागला. ते जमिनीवर पडले आणि त्याचे तुकडे-तुकडे झाले. हे पाहून राहुलच्या पायाखालची जमीनच सरकली. तो प्रचंड घाबरला. वर्गातील इतर मुलांनी त्याला सल्ला दिला, अरे राहुल, घाबरू नकोस! गुरुजी येण्यापूर्वी हे तुकडे खिडकीतून बाहेर फेकून दे आणि गुरुजींनी विचारल्यास सांग की आम्हाला काहीच माहीत नाही. नाहीतर आज गुरुजींची खूप मार खावी लागेल.

राहुलने क्षणभर विचार केला. त्याचे मन त्याला खाऊ लागले. तो स्वतःशीच म्हणाला, चूक माझ्या हातून झाली आहे, मग शिक्षा दुसऱ्याला का मिळावी? आणि मी खोटे बोललो तर माझ्या मनाला कधीच शांतता मिळणार नाही. थोड्या वेळानंतर गुरुजी वर्गात परतले. त्यांनी टेबलवरील उपकरण जागेवर नसल्याचे पाहिले आणि वर्गात विचारले, कोणाच्या हातातून ही काच फुटली? खरे सांगा!

संपूर्ण वर्गात भयाण शांतता पसरली. सगळे मुले मान खाली घालून बसली. एका सेकंदाचाही विलंब न लावता राहुल स्वतःच्या जागेवरून उभा राहिला. त्याचे हात थरथरत होते, पण डोळ्यांत प्रामाणिकपणाची चमक होती. तो गुरुजींसमोर हात जोडून म्हणाला, गुरुजी, माझी चूक झाली. दप्तर भरताना माझ्या हाताचा धक्का लागून ही काच खाली पडली आणि फुटली. मला माफ करा.

गुरुजींच्या चेहऱ्यावर आधी रागाचे भाव उमटले. पण त्यांनी राहुलचा तो थरथरणारा पण ठाम स्वर ऐकला आणि त्याच्या डोळ्यात पाहिले. त्यांना समजले की हा मुलगा जाणीवपूर्वक किंवा मस्ती म्हणून नाहीतर अपघाताने घडलेल्या चुकीची कबुली देत आहे. गुरुजींचा राग क्षणात विरघळला. त्यांनी पुढे येऊन राहुलला जवळ घेतले आणि त्याच्या पाठीवर प्रेमाने हात ठेवला.

गुरुजींनी संपूर्ण वर्गाकडे पाहत मोठ्या आवाजात सांगितले, मुलांनो, काच फुटल्याचे मला नक्कीच वाईट वाटले, पण राहुलने जी हिंमत दाखवली आणि न घाबरता सत्य सांगितले, त्याचा मला अभिमान वाटतो. चूक कुणाकडूनही होऊ शकते, पण ती प्रामाणिकपणे कबूल करण्याचे धाडस प्रत्येकात नसते. आज राहुलने पैशांपेक्षाही मोक्याची अशी 'प्रामाणिकपणाची' किंमत चुकवली आहे.

तो दिवस राहुलच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. शाळेपासून ते महाविद्यालयापर्यंत राहुलची ती ओळख संपूर्ण गावात पसरली. लोक आणि शिक्षक त्याच्यावर डोळे बंद करून विश्वास ठेवू लागले. पुढे जाऊन जेव्हा तो एका मोठ्या कंपनीत अधिकारी झाला, तेव्हा तिथेही त्याच्या याच प्रामाणिकपणामुळे आणि सत्यवादितेमुळे त्याला मोठी पदे आणि मान-सन्मान मिळाला.

तात्पर्य: संकट कितीही मोठे असो किंवा शिक्षेची भीती असो, माणसाने कधीही सत्य सोडता कामा नये.

## आत्मशक्ति



### ज्ञानाची अनुभूती

सरोवराचा उल्लेख केला आहे. तेथे आत्मा हंस वा राजहंस ह्या नावाने ओळखला जातो व तो अद्भूत आनंदाची अनुभूती घेतो.जेव्हा ते कारंजांचे वर्णन करतात तेव्हा ते वेगाने उसळणाऱ्या जलधारांचे वर्णन करीत नाही तर प्रकाश, प्रेम आणि आनंदाने भरलेल्या सुखप्रवाही कारंजांच्या गोष्टी करतात. कारण आत्ममंडळात कोणताही जड पदार्थ असूच शकत नाही. परंतु ही उपमा दिल्याने आंतरीक आनंदाचे सजीव चित्रण डोळ्यांपुढे उभे राहते.

आत्मानंदाची तुलना जेव्हा अतिशय मनमोहक बगीच्याशी केली जाते. तेव्हा आम्हाला काहीसा अंदाज येतो की अंतरीची अनुभूती कशी असू शकते. हा आनंद सदैव टिकून राहतोह्या आनंदाचे अनुभव चिरकाल टिकून राहतात. पुष्कळ काळपर्यंत त्याचा प्रभाव कार्यरत राहून आमचे जीवन आनंदी बनवतो. त्याच्या आठवणीने आमच्या डोळ्यातून आनंदाचे अश्रू येतात आणि आमचे हृदय हर्षाने भरून येते. उदाहरण द्यावयाचे झाल्यास लाओलाचे संत इग्नेशियस यांचे घेता येईल. त्यांनी धर्मप्रसारक लैनेज पादरी ह्यांच्यासमोर कबूल केले की, मेनेरेसामध्ये एक तासभर ध्यान अभ्यास केला तेव्हा अध्यात्माच्या अशा अनेक सत्य बाजू शिकण्यास मिळाल्या की, ह्या जगातील सर्व शिक्षकांनी एकत्र येऊनही ते असे शिकवू शकले नसते. एक दिवस त्यांना हे जग कसे बनले ह्याबद्दलच्या दिव्यज्ञानाचा अनुभव आला. त्यानंतर एके दिवशी त्यांचा आत्मा परमात्म्यामध्ये एकरूप झाला व आनंदाने परिपूर्ण झाला. (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### प्रेमाची स्पंदनं

खरं तर ते बाळ सगळ्यांचं असतं.

शिवानीदीदी : हो, त्याचा संबंध कुटुंबातील इतर सदस्यांबरोबरही असतो, म्हणूनच ते या कुटुंबात जन्म घेतं. सगळ्यांकडून त्याला जेवढं जास्त प्रेम मिळेल तेवढं त्याचं संगोपन चांगलं होईल. त्या आत्म्याने पूर्वायुष्यातील अनेक नाती मागे सोडली आहेत. आता त्याने अनेक लोकांशी नाती जोडण्याची गरज आहे. म्हणून, 'फक्त मीच बाळासाठी सगळं चांगलं करू शकते,' असा विचार आईने करता कामा नये. बाळाला जेव्हा सगळ्यांच्या प्रेमाची स्पंदनं मिळतील तेव्हा आपली काळजी नीट घेतली जातीय असं त्याला वाटेल. त्यासाठी, घरातील मोठ्यांनी प्राधान्याने घरातलं वातावरण प्रसन्न ठेवायला पाहिजे. जेणेकरून घरातली स्पंदनं चांगली राहतील.

सुरेश ओबेरॉय : बाळाला त्याचे आजीआजोबा, काका काकू, शेजारी ह्या सगळ्यांचं प्रेम मिळायला हवं – हे आईसाठीपण चांगलं आहे...

शिवानीदीदी :

हो, कारण बाळाला याचा फायदा होतो. नवजात बाळ म्हणजे पूर्वायुष्यातील शरीर सोडलेला आत्मा आहे आणि तो खूप वेदनातून गेलेला आहे. त्याला कुटुंबातील सदस्यांकडून जेवढी प्रेमाची स्पंदनं मिळतील त्याच्या वेदना कमी होण्यास मदत होईल.

सुरेश ओबेरॉय : हे मला समजलं नाही.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

वेटर : साहेब, आज जेवणात काय विशेष आणू?

पप्पू : असं काहीतरी आण, जे खाल्ल्यावर मला माझे जुने दिवस आठवतील.

वेटर : म्हणजे काय साहेब? पप्पू : साधा वरण-भात आण, म्हणजे आईची आठवण येईल आणि बिल पाहून आजोबांची आठवण येईल!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगातील सर्वात लहान खंड कोणता आहे?

– ऑस्ट्रेलिया

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### कडधान्ये

उपयोग : १) पोषक गुणधर्मामध्ये धान्ये व कडधान्ये यांत बरेच साम्य असले, तरी काही महत्त्वाचे फरक दोघांमध्येही आहेत. डाळींमधील प्रथिनात गंधकाचे प्रमाण कमी असून, नायसिनचे प्रमाण जास्त असते. तर धान्यांमध्ये ते अस्तित्वातच नसते. म्हणून धान्ये व डाळी यांचा एकत्रित आहार हा मांसाहाराशी बरोबरी करू शकतो.

२) सहसा कडधान्य तयार झाल्यावर ती बहुधा आहे तशीच खाल्ली जातात. त्यामुळे त्यातील जीवनसत्त्वे, प्रथिने पूर्णपणे शरीरास उपयोगी ठरतात. तर धान्य सडताना, कांडताना, पॉलिश करताना व दळताना ही जीवनसत्त्वे कमी-जास्त प्रमाणात नष्ट होतात. म्हणून डाळी या जास्त पौष्टिक असतात.

३) अनेक वेळा कडधान्याची डाळ करताना त्यावरील टरफले काढून टाकली जातात. परंतु टरफलात पौष्टिकद्रव्ये काहीच नसतात. फक्त त्यात असलेल्या चोथ्यामुळे आतड्यांची हालचाल वाढून, आतड्यात साचलेला मल पुढे ढकलण्यास मदत होते. त्यामुळे शौचास साफ होते. परंतु टरफलातील टॅनिनमुळे कडधान्यातील लोहाचे शोषण शरीरात कमी प्रमाणात होते. तर टरफल काढलेल्या डाळीमुळे लोहाचे शोषण दोन ते चार पटीने जास्त होते. म्हणून धान्य दळताना पॉलिश करताना जे नुकसान होते, तसे नुकसान डाळींमधून होत नाही.

४) कडधान्यांमध्ये एकदल धान्याप्रमाणेच 'क' जीवनसत्त्वाचा अभाव असतो. परंतु आपल्या देशात कडधान्यांना मोड काढून खाण्याची पारंपरिक पद्धत आहे. या प्रक्रियेमुळे कडधान्यातील एन्झाईम्स उत्तेजित होतात व 'क' जीवनसत्त्वाची निर्मिती होते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या रोटरी क्लब ऑफ प्रियदर्शनीच्या अध्यक्षा प्रभा खंडेलवाल व सचिव सुरेखा मणियार यांच्यासह सर्व नूतन महिला पदाधिकाऱ्यांनी भारतीय स्टेट बँकेच्या शाखाप्रमुख भूमीजा रावत व सहाय्यक प्रांतपाल अजय पिसुटे यांच्या उपस्थितीत पदभार स्वीकारला.

# रोटरी प्रियदर्शनीच्या अध्यक्षपदी प्रभा खंडेलवाल तर सचिवपदी सुरेखा मणियार

नगर – स्थापनेचे रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या रोटरी क्लब ऑफ प्रियदर्शनी या महिला सदस्या असलेल्या क्लबच्या अध्यक्षपदी प्रभा खंडेलवाल व सचिवपदी सुरेखा मणियार यांची निवड झाली आहे. त्यांनी नुकताच आपल्या पदाचा पदभार प्रमुख पाहुण्या भारतीय स्टेट बँकेच्या शाखाप्रमुख भूमीजा रावत यांच्या उपस्थितीत घेतला.

पदग्रहण कार्यक्रमाचा प्रारंभ भावी प्रांतपाल क्षितिज झावरे, सहाय्यक प्रांतपाल अजय पिसूटे, माजी प्रांतपाल शिरीष रायते यांनी रोपट्याला पाणी घालून शुभारंभ केला. नूतन अध्यक्षा प्रभा खंडेलवाल व सचिव सुरेखा मणियार यांना कॉलर प्रदान केल्यावर क्लबच्या नवीन सदस्यांना पिन देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच नूतन बोर्ड ऑफ डायरेक्टरच्या सदस्यांनीही पदभार देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुण्या भूमीजा रावत म्हणाल्या, आज महिला सर्व क्षेत्रात आघाडीवर आहेत. रोटरी क्लब प्रियदर्शनीच्या माध्यमातून महिलांचे महिलांसाठी होणारे उत्कृष्ट काम कौतुकास्पद आहे. क्लबच्या पदाधिकारी व सदस्यांनी वर्षभर राबवलेल्या लोकाभिमुख प्रकल्पांमुळे गरजूंना चांगला उपयोग झाला आहे. या लोकसेवेच्या कार्यात मलाही सहभागी होण्यास आनंद होईल.

नूतन अध्यक्षा प्रभा खंडेलवाल म्हणाल्या, रोटरी क्लब प्रियदर्शनीच्या माध्यमातून होणारे समाजसेवेचे कार्य पुढे नेत अधिक वाढवून येणाऱ्या वर्षात विविध मोठमोठे प्रकल्प हाती घेणार आहे अध्यक्ष पदाच्या दिलेल्या जबाबदारीमुळे नवीन विचार नवीन ऊर्जा, प्रेरणा आणि समाजासाठी काहीतरी चांगले करण्याची जिद्द मिळाली आहे.

प्रियदर्शनी क्लबच्या रौप्यमहोत्सवी वर्षांची वैभवशाली वाटचालीचा कार्याचा आढावा चार्टर्ड प्रेसिडेंट डॉ. कुंदा हळबे व माजी अध्यक्षा देविका रेळे यांनी स्लाईड शो द्वारे सादर केला.यावेळी मावळत्या अध्यक्षा अनुराधा आठरे यांच्या वतीने पास्ट प्रेसिडेंट माधुरी सारडा यांनी मागील वर्षाचा आढावा सादर केला.

सहाय्यक प्रांतपाल अजय पिसूटे यांनी ३१३२ चे प्रांतपाल जयेश पटेल यांचा मार्गदर्शनपर शुभसंदेश वाचला. यावेळी रोटरीचा आकांक्षा या दहावीच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त असलेल्या स्व अभ्यास या ऑनलाइन स्टडी पच्या कूपनचे हस्तांतरण अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छाया फिरोदिया यांच्या कडे करण्यात आले. या कार्यक्रमास डॉ.सुधा कांकरिया यांच्यासह शहरातील अन्य रोटरी क्लबचे पदाधिकारी, रोटरी प्रियदर्शनीच्या सर्व पदाधिकारी व सदस्या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभा तांबडे व देवीका रेळे यांनी केले. नूतन सेक्रेटरी सुरेखा मणियार यांनी आभार मानले.

# वाळकीत ईद-ए-मिलादनिमित्त हिंदू-मुस्लीम एकतेचे दर्शन

नगर – ईद–ए–मिलाद (मोहंमद पैगंबर जयंती) निमित्त वाळकी (ता. नगर) येथे मुस्लिम बांधवांनी उत्साहात ईद साजरी केली. या पवित्र सणाच्या निमित्ताने विजय भालसिंग यांनी गावातील मुस्लिम समाजातील नागरिकांना गुलाबपुष्प देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. प्रेम, बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमातून वाळकी गावात हिंदू–मुस्लीम ऐक्याचे दर्शन घडले.

गावातील मुख्य चौकात ईदच्या पार्श्वभूमीवर सजावट करुन प्रसाद वाटप करण्यात आले.

गावातील मुस्लिम समाजातील ज्येष्ठ नागरिक, युवक तसेच लहान मुलांची भेट घेऊन विजय भालसिंग यांनी त्यांना गुलाबपुष्प देत 'ईद मुबारक' केले. यावेळी बब्बू पठाण, फारूख शेख, अलीम शेख, आझाद बेग, हानीफ शेख, फिरोज आत्तार, समी शेख, आयान पठाण, आतीक पठाण यांच्यासह भाजपचे गणेश भालसिंग आदी उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## अलौकिक मानव हा देवाचा अंश




वाल्मिकीचा राम म्हणतो, आत्मानं मानुष मन्ये रामं दशरथात्मजम

मला देव मानण्याचं काहीच कारण नाही. मला ते रुचणारही नाही. कारण मी जाणतो की मी माणूस आहे. दशरथाचा मी मुलगा आहे. अयोध्येची प्रजा देखील रामचंद्रासाठी देवाना प्रार्थना करते. कारण रामचंद्र त्यांच्यापैकीच एक आहे. सर्वान्देवान्नम स्यन्ति रामस्याथे।

रामचंद्र देव नाही. माणूस आहे. म्हणूनच रामचंद्र मर्यादापुरुषोत्तम आहे. ब्रम्हदेवानेही वाल्मिकी ऋषीला एक सद्गुणी, स्वच्छील व आदर्श पुरुषाचे चरित्र म्हणून रामकथा सांगितली आहे.

असामान्य कर्तृत्व आणि अलौकिक चारित्र्य अनुभवविणे दुर्मिळ. सर्वसामान्य माणसाला त्याम ळेच तसे कुठे आढळले की, तेथे देवत्व जाणवते. मानवजातीच्या कल्याणासाठी जन्मलेल्या अशा महान विभूती म्हणजे देवाचे अवतारच असे म्हणण्याची लोकशैली आढळते. भगवतगीतेत श्रीकृष्ण हेच सांगतात. यद यद विभूतिमत्सत्त्व श्रीमदर्जितमेव वा। तत्तदेवावगच्छत्व मम तेजो शसंभवम।।

हे अर्जुना सामान्य जनाहून वेगळंच कल्याणकारी कर्तृत्व गजावणाऱ्या थोर विभूतींच्या ठायी, दृष्टाचं निर्दालन करणाऱ्या लोकोत्तर बलवंताच्या ठायी परहितदक्ष कीर्तिमान मानवाच्या ठायी देवांचा अंश आहे असं जाणं.

म्हणून लोकही अशा अलौकिक पुरुषाला दैवी अवतार मानतात. संत सेना महाराज देखील निवृत्तीनाथांना शिवाचा अवतार मानतात. ते याचमुळे शिवाचा अवतार। स्वामी निवृत्ती दातार।। निवृत्ती निवृत्ती म्हणता पाप नुरेचि ।। ध्यान धरिता निवृत्ती। आनंदमय राहे वृत्ती। जप करता त्रिअक्षरी। मुक्ति लोळे चरणावरी ।। सेना म्हणजे चित्ती धरा । स्मरता चुकती येरझारा ।।

लोकांना आनंद देणारा, दैन्य, दुःख व दारिद्र्यांपासून मुक्ती करणारा, लोकांना सन्मार्गाला लावणारा, पापबुद्धीचा नाश करणारा निवृत्ती, हा शिवचाच अवतार.

माणसाला अवतार मानण्याची ही प्रवृत्ती जनसामान्यांची चित्तवृत्ती उल्हासित करुन त्यांना कर्तृत्व गाजवायला प्रात्साहन देण्यासाठी आहे. संत एकनाथ पाहा कशी मूल्यरचना करतात.

शिवअवतार तुचि धरुन। केले त्रैलोक्य पावन।। निवृत्तिनाथाचे चरणी । शरण एका जनार्दनी ।।

निवृत्तिनाथांनीच शंकराचा अवतार घेतला. जगाला सर्व प्रकारच्या दुःखातून मुक्त केले. दुष्टबुद्धीचा नाश करुन माणसाची बुद्धी व चित्तशुद्धी सम्यक केली. अशा थोर पुरुषाच्या चरणी नाथच काय, पण सगळे हे अनाथ लोक देखील चरणशरण होतात. सनाथ व्हावे म्हणून.

दुष्ट प्रवृत्तीच्या विध्वंसक रावणाला देवंही मारु शकले नाहीत ते एका पुरुषाने केले. रामाने केले. हा संदेश माणसाला केवढे धैर्य, शौर्य आणि औहार्य अंगी बाणवायला उपकारक ठरतो। माणूस सर्वशक्तिमान आहे. माणूस अलौकिक बळाने दुःखदैन्यादी विपत्तींपासून स्वतःची सुटका करायला समर्थ आहे. हे आत्मभान माणसाला देण्यासाठीच राम जगाला सांगतो आहे. मी मनुष्यच आहे. मी दशरथाचा पुत्र आहे.

शिवरायांनी बलदंड मोगल सैन्याला खडे चारले, ते आत्मबलाला जागवूनच ना? हरहर महादेवच्या घोषणेने मावळे भारावले व त्यांच्यात सामर्थ्य संचारले, हे आत्मबल, जागृतीचेच लक्षण.

– किशोर गांधी

# वाडिया पार्क लेडीज क्लबमध्ये श्रावणी हळदीकुंकू समारंभ संपन्न; डोळे निरोगी तर जग सुंदर या विषयावर डॉ. तांबोळींचे मार्गदर्शन

नगर – वाडिया पार्क लेडीज क्लबच्या वतीने नुकताच श्रावणी शुक्रवारनिमित्त उत्साहात हळदीकुंकू समारंभ साजरा करण्यात आला. या प्रसंगी आयोजित विशेष आरोग्य सत्रात नगरचे सुप्रसिद्ध नेत्र व रेटिना तज्ज्ञ डॉ. क्षितिज सुचित तांबोळी यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

क्लबच्या अध्यक्षा नीलिमा औटी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात डॉ. क्षितिज तांबोळी यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने झाली. यावेळी मेधा वाळिंबे व नीलिमा औटी यांनी प्रार्थना सादर केली. सुनीता देव आणि मीरा पाठक यांनी सुंदर फुलांचे व रांगोळीचे डेकोरेशन करत कार्यक्रमाची शोभा वाढवली.

प्रमुख वक्ता म्हणून बोलताना डॉ. क्षितिज तांबोळी यांनी डोळे निरोगी तर जग सुंदर या विषयावर उपस्थितांशी संवाद साधला. त्यांनी पन्नाशीनंतर महिलांनी डोळ्यांची घ्यावयाची काळजी, लवकर केलेल्या उपचारांचे महत्त्व आणि आधुनिक तपासण्यांवर सविस्तर प्रकाश टाकला. तसेच त्यांनी रेटिनाच्या तपासण्या व निदान वेळेवर केल्यास दृष्टी वाचवणे शक्य होते. मोतीबिंदूच्या आधी आणि नंतर रेटिना तपासणी करणे अत्यंत गरजेचे आहे. मोतीबिंदू शस्त्रक्रियेमध्ये कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी तज्ज्ञांचा योग्य सल्ला घेणे आवश्यक असते. मधुमेह (डायबिटीस) असलेल्या रुग्णांनी नियमितपणे रेटिनाची तपासणी करावी. लेझरचा वापर किंवा डोळ्यात इंजेक्शन देण्याच्या आधुनिक पद्धतीमुळे रुग्णाला पुन्हा नॉर्मल दिसू शकते. ज्या लोकांना डोळ्याचा नंबर खूप जास्त आहे, त्यांनी डोळ्याचा पडदा (रेटिना) तपासून घेणे अनिवार्य असते, असे मार्गदर्शन केले.



वाडिया पार्क लेडीज क्लबच्या सदस्यांना डॉ. क्षितिज तांबोळी यांनी डोळ्यांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन केले.

मोतीबिंदूच्या क्लिष्ट व रेटिना शस्त्रक्रियांमध्ये निपुण असलेल्या डॉ. क्षितिज तांबोळी यांनी अहिल्यानगर येथील क्रेस्ट आय क्लिनिकमध्ये मागील दीड वर्षांत तब्बल एक हजार यशस्वी शस्त्रक्रिया करून एक विक्रम प्रस्थापित केला असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

नेहा तांबोळी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुनीता देव यांनी सूत्रसंचालन केले. अध्यक्ष नीलिमा औटी यांच्या हस्ते रेटिना तज्ज्ञ डॉ. क्षितिज तांबोळी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी सेक्रेटरी सुनीता देव, मीनाक्षी पाठक, मेधा वाळिंबे, नेहा तांबोळी, हेमा मिसळ आदी महिलांनी विशेष परिश्रम घेतले.

# रोटरी इंटिग्रिटीकडून समर्थ प्रशालेला इंटरॅक्टिव्ह टीव्ही, स्वच्छता साहित्य भेट

नगर – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीच्या वतीने श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेला इंटरॅक्टिव्ह टीव्ही पॅनल, हात धुण्यासाठी स्टील वॉश बेसिन तसेच ओला व सुका कचरा संकलनासाठी प्लास्टिक ड्रम भेट देण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षणासोबतच स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचे संस्कार मिळण्यास मदत होणार आहे. रोटरीच्या विविध उपक्रमांमध्ये डिजिटल शिक्षणाला दिले जाणारे महत्त्व यापूर्वीही दिसून आले आहे. कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीचे अध्यक्ष डॉ. सईद शेख, निखिल कुलकर्णी, अ‍ॅड. ज्योत्स्ना ससाणे, शुभश्री पटनाईक, प्रियंका चिखले तसेच संस्थेचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव सुरेश क्षीरसागर, शालेय समिती चेअरमन अ‍ॅड. किशोर देशपांडे व पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी आदी उपस्थित होते.

डॉ. सईद शेख म्हणाले, समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून गरजूंपर्यंत मदत पोहोचविता येते, याचे समाधान काम करण्याची नवी ऊर्जा व प्रेरणा देते. श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे कार्य शिक्षणाभिमुख असल्याने प्रशालेला उपयुक्त साहित्य देताना मनस्वी आनंद होत आहे.

प्रशालेच्या प्राचार्या वसुधा जोशी यांच्या नियोजनात संपन्न झालेल्या सोहळ्यामध्ये फुलांच्या वर्षावात व ढोल–ताशांच्या गजरात मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रमुख अतिथींच्या हस्ते श्री समर्थ प्रतिमापूजन करण्यात आले. समर्थ सभागृहात झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. पर्यवेक्षक कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात सांगितले, शाळेच्या प्रगतीसोबत विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अशा सहकार्याची आवश्यकता असते. रोटरी क्लबने दिलेल्या भेटवस्तू विद्यार्थ्यांच्या प्रगतीला निश्चितच नवी दिशा देतील.



रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीच्या वतीने समर्थ प्रशालेला इंटरॅक्टिव्ह टीव्ही पॅनल, स्वच्छता साहित्य भेट देताना रोटरीचे पदाधिकारी.

प्रियंका चिखले यांनी प्रशालेसोबत यापुढेही विविध उपक्रमांत सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली. निखिल कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांनी मिळालेल्या सुविधांचा योग्य उपयोग करून चांगल्या सवयी आत्मसात करण्याचे आवाहन केले. सचिव सुरेश क्षीरसागर यांनी रोटरी क्लबची मदत शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले. आभार अस्मिता कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमासाठी अवघडे, पोपट लोंढे, अरुण राशिनकर तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# पेमराज सारडा महाविद्यालयाच्या गायकेंची रेड रन मॅरेथॉन स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी

नगर – जिल्हा शासकीय रुग्णालयाच्यावतीने आयोजित रेड रन मॅरेथॉन स्पर्धेत पेमराज सारडा महाविद्यालयाचा खेळाडू कृष्णा गायके याने प्रथम क्रमांक पटकावला होता. तसेच राज्यस्तरीय रेड रन मॅरेथॉन स्पर्धेतही त्याने चौथा क्रमांक पटकावला. याबद्दल त्याचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला.



कृष्णा गायके याचा पेमराज सारडा महाविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला.

कोल्हापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय रेड रन मॅरेथॉन स्पर्धेत कृष्णा गायके याने उत्कृष्ट कामगिरी करत चौथा क्रमांक मिळविला. राज्यस्तरीय स्पर्धेतील त्याच्या कामगिरीबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्याला दहा हजार रुपये रोख पारितोषिक, मेडल व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. अनंत फडणीस, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, उपप्राचार्य प्रा. मिलिंद देशपांडे, प्रा. गिरीश पाखरे, पर्यवेक्षक डॉ. सुजित कुमावत, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी कृष्णा गायकेच्या यशाचे कौतुक केले. कृष्णा गायकेच्या या यशामुळे पेमराज सारडा महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला. कृष्णा गायके याला प्रा. संजय साठे, अक्षय कर्डिले यांचे मार्गदर्शन लाभले.



हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या ऐतिहासिक पवित्र केस दर्शनासाठी झालेली गर्दी.

# हजरत मोहम्मद पैगंबर यांचे ऐतिहासिक पवित्र केस दर्शनास खुले

नगर – मोहंमद पैगंबर यांची जयंती ईद मिलादुन्नबी (झेंडा ईद) म्हणून २६ ऑगस्ट रोजी सर्वत्र उत्साहात साजरी झाली. या निमित्त सालाबाद प्रमाणे शहरातील तख्ती दरवाजा (मीर मुर्तूजा तख्ती दरवाजा महल) येथे मोहंमद पैगंबर यांचे पवित्र केस (हजरत बाल) भाविकांच्या दर्शनासाठी खुले केले आहेत. तसेच यावेळी विविध धार्मिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, या पवित्र केसाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

येथील पुजारी सय्यद बुर्हाण कादरी चिश्ती यांनी सांगितले की, देशात ७ ते ८ ठिकाणी मोहम्मद पैगंबर यांचे पवित्र केस दर्शनासाठी उपलब्ध असतात या ठिकाणांमध्ये आपल्या अहमदनगरचा समावेश आहे. अहमदनगरचा जो जुना मुघल कालीन इतिहास आहे त्या इतिहासात हजरत मोहम्मद पैगंबर यांचे पवित्र केसाचा उल्लेख केलेला आहे. ज्याचा पुरावा पुजारी सय्यद बुरान कादरी चिस्ती यांच्या जवळ उपलब्ध आहे.

नगरला परंपरेनुसार दरवर्षी फक्त हजरत मोहंमद पैगंबर यांच्या जयंती दिनीच पवित्र केस दर्शनासाठी खुले करण्यात येतात. याच दिवशी नगर शहरातून झेंड्याची मिरवणुक तक्ति दरवाजा, माणिक चौक, कापड बाजार, सर्जेपुरा, मंगल गेट, झेंडीगेट, हातमपुरा, जुना बाजार, पाचपीर चावडी, सबजेल चौक, तक्ति दरवाजा येथे समारोप केला जातो. मिरवणुकीच्या ठिकाणी विविध आकर्षक देखावे, विद्युत रोषणाई व ठिकठिकाणी प्रसादाचे वाटप केले जाते.

# पंडिता रमाबाईंच्या अनुवादित बायबलची दुर्मिळ प्रत ऐतिहासिक वस्तू संग्रहालयात

## १९२४ मध्ये प्रकाशित झालेल्या ऐतिहासिक ग्रंथाचे नगरमध्ये कायमस्वरुपी जतन

नगर – स्त्रीशिक्षणाच्या अग्रदूत, विदुषी आणि समाजसुधारक पंडिता रम ाबाई यांनी अनुवादित केलेल्या बायबलची सन १९२४ मध्ये प्रकाशित झालेली दुर्मिळ प्रत अहिल्यानगर येथील ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्रात कायमस्वरूपी जतनासाठी जमा करण्यात आली आहे. पंडिता रमाबाईंची विद्वत्ता, त्यांचे भाषांतर कार्य तसेच स्त्रीशिक्षण आणि सामाजिक सुधारणांसाठी त्यांनी केलेल्या व्यापक कार्याची साक्ष देणारा हा ऐतिहासिक ग्रंथ संग्रहालयाच्या ठेव्यामध्ये महत्त्वाची भर ठरला आहे.

सावेडी येथील रविंद्र प्रेमचंद ठोंबरे यांनी ही दुर्मिळ प्रत ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्राचे क्युरेटर डॉ. संतोष यादव यांच्याकडे स्वखुशीने संग्रहालयासाठी कायमस्वरूपी देणगी म्हणून सुपूर्द केली. त्यांनी २४ ऑगस्ट २०२६ रोजी यासंदर्भात संग्रहालयाच्या कार्यकारी विश्वस्तांकडे लेखी अर्ज दिला. त्यांच्या अर्जानुसार, ही प्रत पंडिता रमाबाई यांनी भाषांतरित केलेल्या पहिल्या शंभर प्रतींपैकी एक असून, सन १९२४ मध्ये प्रकाशित झालेली आहे. सदर ग्रंथाची संग्रहालयात आवक क्रमांक ४२५/२०२६, दि. २४ ऑगस्ट २०२६ अशी नोंद करण्यात आली आहे. हा ऐतिहासिक ग्रंथ किरण साळवी (सोलापूर) यांच्या नावाने जतन करून ठेवावा, अशी विनंतीही देणगीदारांनी केली आहे.



पंडिता रमाबाई यांनी अनुवादित केलेल्या बायबलची सन १९२४ मध्ये प्रकाशित झालेली दुर्मिळ प्रत ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्राचे क्युरेटर डॉ. संतोष यादव यांच्याकडे सुदूर्प करताना रविंद्र ठोंबरे आदी.

पंडिता रमाबाईंचा जन्म २३ एप्रिल १८५८ रोजी झाला. त्यांचे वडील अनंतशास्त्री डोंगरे हे संस्कृत व वेदशास्त्राचे विद्वान होते. त्या काळात महिलांना शिक्षणापासून, विशेषतः संस्कृत शिक्षणापासून दूर ठेवले जात असतानाही अनंतशास्त्री यांनी रमाबाईंना संस्कृतचे शिक्षण दिले. रमाबाईंनी संस्कृत भाषेवर असामान्य प्रभुत्व मिळविले. सन १८७८ मध्ये कोलकाता येथे त्यांच्या विद्वत्तेचा गौरव करण्यात आला आणि त्यांना पंडिता तसेच सरस्वती या पदव्या प्रदान करण्यात आल्या. पंडिता रमाबाईंच्या कार्यातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे बायबलचे मराठी भाषांतर. त्यांनी मूळ भाषांचा अभ्यास करून मराठीत भाषांतराचे काम केले. हे काम अनेक वर्षे सुरू होते. उपलब्ध ऐतिहासिक संदर्भांनुसार, ४ एप्रिल १९२२ रोजी बायबलच्या भाषांतराचे शेवटचे पान पूर्ण करून ते मुद्रणासाठी देण्यात आले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी, म्हणजे ५ एप्रिल १९२२ रोजी पंडिता रमाबाईंचे निधन झाले. पुढे त्यांच्या मराठी बायबल भाषांतराची मुद्रित आवृत्ती सन १९२४ मध्ये प्रकाशित झाली. त्यामुळे संग्रहालयात दाखल झालेली १९२४ मधील ही प्रत त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यातील महत्त्वपूर्ण भाषांतर कार्याशी जोडलेली आहे. हा ग्रंथ धार्मिक साहित्यापुरता मर्यादित नसून मराठी भाषांतराचा इतिहास, भाषिक अभ्यास, स्त्रीशिक्षण आणि सामाजिक परिवर्तन यांचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांसाठीही महत्त्वपूर्ण संदर्भसामग्री ठरू शकतो.

ही दुर्मिळ ऐतिहासिक प्रत संग्रहालयाला कायमस्वरूपी देणगी म्हणून दिल्याबद्दल ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्राचे क्युरेटर डॉ. संतोष यादव यांनी देणगीदार रविंद्र प्रेमचंद ठोंबरे यांचे आभार मानले. ही दुर्मिळ प्रत अभ्यासक आणि संशोधकांसाठी उपलब्ध करून देण्यात येईल. या प्रतीवर पुढील संशोधन करण्यासाठीही ती महत्त्वपूर्ण संदर्भसामग्री ठरेल, संग्रहालयाचे कार्यकारी विश्वस्त डॉ. साताळकर यांनी सांगितले.

# धम्माल मनोरंजन

**सुविचार**



''पुस्तकाची किमत रत्नापेक्षाही अधिक आहे.''

## दिनविशेष २८ ऑगस्ट

१७४९ : 'योहान वूल्फगाँग गटे' जर्मन महाकवी, कलाकार यांचा जन्म. (मृत्यू : २२ मार्च १८३२)
१८५५ : 'नारायण गुरु' भारतीय समाजसुधारक यांचा जन्म.
१८९६ : 'रघुपती सहाय गोरखपुरी' उर्दू शायर यांचा जन्म. (मृत्यू : ३ मार्च १९८२)
१९०६ : 'चिंतामणी गोविंद पेंडसे' रंगभूमी अभिनेते यांचा जन्म.
१९१८ : 'राम कदम' मराठी चित्रपट प्रसिद्ध संगीतकार यांचा जन्म. (मृत्यू : १९ फेब्रुवारी १९९७)
१९२८ : 'एम. जी. के. मेनन' भारतीय पदार्थ वैज्ञानिक यांचा जन्म.
१९२८ : 'उस्ताद विलायत खाँ' सुप्रसिद्ध सतारवादक यांचा जन्म. (मृत्यू : १३ मार्च २००४)
१९३४ : 'सुजाता मनोहर' सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्षा यांचा जन्म.
१९३८ : 'पॉल मार्टिन' कॅनडाचे पंतप्रधान यांचा जन्म.
१९५२ : 'जगदीश सिंग खेहर' भारताचे ४४ वे सरन्यायाधीश यांचा जन्म.
१९५४ : 'रवी कंबुर' भारतीय-इंग्लिश अर्थशास्त्री यांचा जन्म.
१९६५ : 'सातोशी ताजीरी' पोकेमोन चे निर्माते यांचा जन्म.
१९६६ : 'प्रिया दत्त' माजी खासदार यांचा जन्म.
१६६७ : 'मिर्झाराजे जयसिंग' जयपूर चे राजे यांचे निधन. (जन्म : १५ जुलै १६११)
१९६९ : 'रावसाहेब पटवर्धन' भारतीय स्वातंत्र्यसैनिक, विचारवंत यांचे निधन.
१९८४ : 'मुहम्मद नागुब' इजिप्तचे पहिले राष्ट्रपती यांचे निधन. (जन्म : १९ फेब्रुवारी १९०१)
२००१ : 'व्यंकटेश माडगूळकर' लेखक, चित्रकार, पटकथाकार यांचे निधन. (जन्म : ६ जुलै १९२७)

१८४५ : सायंटिफिक अमेरिकन मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९१६ : पहिले महायुद्ध जर्मनीने रोमानियाविरुद्ध युद्ध पुकारले.
१९१६ : पहिले महायुद्ध इटालीने जर्मनी विरुद्ध युद्ध पुकारले.
१९३१ : फ्रान्स आणि सोव्हिएत युनियनने युद्धविरामावर स्वाक्षरी केली.
१९३७ : टोयोटा मोटर्स एक स्वतंत्र कंपनी बनली.१९९० : इराकने कुवेतला स्वतःचा प्रांत म्हणून घोषित केले.

### सांगा कोण?

१) कोंबडी एक अशी निराळी, चालून चालून थकून जाये.
आणा चाकू कापा मान,
पुन्हा ती चालत जाये.
२) देशाविदेशात फिरे ती बाई, ज्याला मिळाली त्याला
फारच घाई
ना चामडी ना हाडं ना रक्त,
ज्यांनी ज्यांनी पाहालं,
तो विचार करे फक्त.

## महाशब्दकोडे



### आडवे संकेत

१) विदर्भातील थंड हवेचे ठिकाण
४) विमान
७) कोरे बुक
९) ताकद, क्षमता
१०) गुणणारी संख्या
११) पाऊस पाण्याचे दिवस
१३) दिराची पत्नी
१५) एक मानवी नाव
१७) होडी
१९) नेहमी रडणारा
२२) एक मराठी महिना
२४) हिरो
२५) लाजाळू
२७) म्हातारपणी आलेला बुद्धिभ्रंश
३०) आडकाठी, प्रतिबंध
३१) एका जातीचे नाव
३२) पदर
३४) एक पक्षी
३५) गुराढोरांना बांधण्याची दोरी
३७) दगडकाम करणारी किंवा त्यावर नक्षीकाम करणारी जात
३९) एक पालेभाजी
४१) पाण्याचा नैसर्गिक मोठा प्रवाह
४२) एक प्रसिद्ध आडनाव
४३) प्रस्तावित व्यवस्थेविरुद्ध उभे राहणे
४४) नोकरी, चाकरी
४५) आवर, ताबा
४६) प्रेत गाढलेले ठिकाण
४७) शरद पवारांचा बालेकिल्ला

### उभे संकेत

१) प्राणीमात्राच्या पापपुण्याचा हिशेब ठेवणारा यमाचा लेखक
२) त्वरित
३) याचे ताक बनते
४) आपण (हिं.)
५) कातीव काम
६) येण्याजाण्याचा हेलपाटा
८) मोठा आवाज
९) काम न करता नुसते खाणारा
११) माळरान, टेकडी
१२) नवऱ्याचे वडील
१४) छाती
१६) रात्र
१८) एकी, संघ
१९) एक मुसलमानी महिना
२०) तक्रार
२१) वाईट विचार
२२) मानाची हद्द
२३) हाती धरुन चालवयाची काडी
२६) कोंदणात बसविण्याचे काम
२७) दुधावरचा पोपडा
२८) कानात सांगितलेला गुरुमंत्र
२९) बांगडी
३२) दोन शेतातून गेलेला रस्ता
३३) चमू, थवा
३४) झरोका
३६) शेतात राहणे
३७) नासाडी, अवहेलना
३८) xx मैदा
४०) सुपीक जमीन
४२) गो
४३) एक जात
४५) मोका

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अं | दा | ज | अ | प | ना | अ | प | ना | | ब | ग | ळा |
| त | वा | य | फ | | का | क | | ट | प | र | णे | |
| | | | गा | ला | व | र | ती | | श्चा | | श | ह |
| आ | णि | बा | णी | | र | मा | | वै | ता | ग | | म |
| रा | | री | स्ता | | वा | ही | त | | प | ट | वा | री |
| ख | ट | क | न | | ट | | र | सा | | प | ण | तु |
| डा | | सा | | | क | र | व | त | | ट | | म |
| | | रि | त | स | र | | णी | | आ | णे | वा | री |
| इं | | क | र | म | णे | | | नि | शा | | | व |
| डो | ळा | | त | य | | दा | न | व | | पा | झ | र |
| ने | | सा | म | सु | म | | व | ड | | रा | | ये |
| शि | क्षा | | भा | च | र | | रे | णु | का | श | हा | णे |
| या | | पा | व | क | | | | क | च | र | ट | |




भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगः

- डिझेल लोकोमोटिव्ह वर्क्स, वाराणसी (उत्तर प्रदेश)
- फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, सिंद्री (झारखंड), गोरखपूर (उत्तर प्रदेश), तालचेर (ओरिसा), रामागुंडम (उत्तर प्रदेश)
- नॅशनल फर्टिलायझर लिमिटेड, नानगल (पंजाब), येथे दोन प्रकल्प, भटिंडा (पंजाब), पानिपत (हरियाना) येथे प्रत्येकी एक.
- हिंदुस्थान फर्टिलायझर कॉर्पोरेशन, दुर्गापूर (पश्चिम बंगाल), बरौनी (बेगुसराई- बिहार)
- राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर, तुर्भे (मुंबई), थळ-वायशेत (रायगड).
- हेवी इंजिनिअरिंग फॅक्टरी, रांची (झारखंड)
- हेवी व्हेईकल्स फॅक्टरी, आवडी (तमिळनाडू)
- हिंदुस्थान अँटिबायोटिक्स लिमिटेड, पिंपरी- पुणे (महाराष्ट्र)
- हिंदुस्थान एअरोनॉटिक्स लिमिटेड, बंगळुरु (कर्नाटक), हैदराबाद (आंध्रप्रदेश), कोरापूत (ओरिसा), ओझर (नाशिक- महाराष्ट्र), करवा, बराकपूर, लखनौ, कानपूर (सर्व उत्तर प्रदेश)
- हिंदुस्थान ऑरगॅनिक केमिकल्स, रसायनी- पनवेल (रायगड- महाराष्ट्र)
- हिंदुस्थान इन्सेक्टिसाईड्स लिमिटेड, दिल्ली, उद्योगमंडळ (केरळ), रसायनी- पनवेल (रायगड- महाराष्ट्र)
- हिंदुस्थान मशिन टूल्स, नवी दिल्ली, बंगळुरु (कर्नाटक).
- हिंदुस्थान शिपयार्डस्, विशाखापट्टणम (आंध्रप्रदेश)
- ब्रम्हपुत्रा व्हॅली फर्टिलायझर कॉर्पोरेशन लिमिटेड, नामरुप (आसाम) तीन प्रकल्प.
- अरवली जिप्सम अँड मिनरल इंडिया लिमिटेड, जोधपूर (राजस्थान)
- दी फर्टिलायझर अँड केमिकल्स त्रावणकोर लिमिटेड, उद्योगमंडळ केरळ येथे एक प्रकल्प व कोचीन येथे दोन प्रकल्प.
- हिंदुस्थान स्टील लिमिटेड, रांची (झारखंड), भिलाई (छत्तीसगढ), दुर्गापूर (पश्चिम बंगाल), रुरकेला (ओरिसा)
- हिंदुस्थान आयर्न अँड स्टील कंपनी, बर्नपूर (पश्चिम बंगाल)
- इंडियन ड्रग्ज फार्मास्युटिकल्स (अँटिबायोटिक्स), हृषिकेश (उत्तराखंड).
- इंडियन ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्स (सिंथेटिक ड्रग्ज), हैदराबाद (आंध्रप्रदेश)
- इंडियन ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्स, गुरगाव (हरियाना), मुझफ्फरपूर(बिहार)
- इंडियन ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्स, (सर्जिकल इन्स्ट्रुमेंट्स), गिंडी (चेन्नई- तमिळनाडू)
- इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीज, बंगळुरु (कर्नाटक)
- हिंदुस्थान केबल्स, रुपनारायणपूर (पश्चिम बंगाल)
- इंटिग्रल कोच फॅक्टरी, पेरांबूर (चेन्नई- तामिळनाडू)
- ज्यूट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कोलकाता (पश्चिम बंगाल)
- माझगाव डॉक, मुंबई (महाराष्ट्र)
- नॅशनल न्यूजप्रिंट अँड पेपर मिल्स लिमिटेड, नेपानगर (मध्यप्रदेश)
- तुंगभद्रा स्टील प्रॉडक्टस, तुंगभद्रा (कर्नाटक)
- हिंदुस्थान फोटो फिल्म्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड, उधगमंगडम (तमिळनाडू)
- विश्वेश्वरय्या आयर्न अँण्ड स्टील लिमिटेड, भद्रावती (कर्नाटक)
- हिंदुस्थान अॅल्युमिनिअम, रेणुकूट (उत्तर प्रदेश)
- सिक्युरिटी पेपर मिल, होशंगाबाद (मध्यप्रदेश

..................

भारतातील पहिल्या व्यक्ती

- भारतातील पहिला मोगल राज्यकर्ता- बाबर
- ब्रिटिश हिंदुस्थानचा पहिला गव्हर्नर जनरल - वॉरन हेस्टिंग्ज
- ब्रिटिश हिंदुस्थानचे शेवटचे गव्हर्नर जनरल- लॉर्ड कॅनिंग
- ब्रिटिश हिंदुस्थानचे पहिले व्हाईसरॉय- लॉर्ड कॅनिंग
- ब्रिटिश हिंदुस्थानचे शेवटचे व्हाईसरॉय - लॉर्ड माऊंटबॅटन
- स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल- लॉर्ड माऊंटबॅटन
- स्वतंत्र भारताचे दुसरे गव्हर्नर जनरल- चक्रवर्ती राजगोपालाचारी

## फिल्मी शब्दकोडे





### आडवे संकेत

१)सन् १९९२ मध्ये निर्देशक फिरोज खानच्या या चित्रपटात संजय दत्त, नगमा आणि मनीषा कोईराला होते.
२) बरसात में जब आयेगा सावन का महिना... हे गीत या चित्रपटातील आहे. ६) सन् २००० मध्ये योगेश ईश्वरच्या या चित्रपटात सुनील शेट्टी आणि सुश्मिता सेन होते.
७) सन् २००१ मध्ये निर्देशक अब्बास मस्तानच्या या चित्रपटात सलमान खान, रानी मुखर्जी आणि प्रिती झिंटा होते.
१०) आफताब शिवदासानी आणि उर्मिला मातोंडकर अभिनीत चित्रपट. १२) राजू XX (फिल्म)
१३) रानी मुखर्जीचा पहिला चित्रपट. १५)एक प्रसिद्ध गायक (स्वर्गीय) १६)सन् १९९७ मध्ये रजत रवैलच्या या चित्रपटात संजय कपूर आणि शिल्पा शेट्टी होते.
१७)गोविंदा आणि जुही चावला अभिनीत चित्रपट.
१९)या चित्रपटात सुनील शेट्टी, करीश्मा कपूर आणि सोनाली बेंद्रे होते.
२१)सन् १९९५ मध्ये भरत रंगाचारीच्या निर्देशन बनलेल्या या चित्रपटात सुनील शेट्टी आणि सोनाली बेंद्रे होते.
२२) जैकी श्रॉफ, अनिल कपूर, माधूरी दीक्षीत आणि नाना पाटेकर अभिनीत फिल्म.
२४) दिल का XXX मै क्या.....
२६) सन् १९९५ मध्ये बनलेल्या या चित्रपटात सुनील शेट्टी, शिल्पा शिरोडकर होते.
२७)सन् १९९७ मध्ये निर्देशक महेश भट्टच्या या चित्रपटात शरद कपूर आणि पुजा भट्ट होते.

### उभे संकेत

१)सन् १९९७ मध्ये बनलेल्या या चित्रपटात दिल तो पागल है चे निर्देशक.
३) सन् १९९३ मध्ये निर्देशक अवतार भोगलच्या या चित्रपटात जितेंद्र आणि डिंपल कपाडिया होते. ४) अमिताभ बच्चन, अमृता सिंह आणि जैकी श्रॉफ अभिनीत फिल्म.
५) XXX साजन के (फिल्म)
८) सन् २००२ मध्ये डेविड धवन निर्देशित या चित्रपटात बॉबी देओल, शिल्पा शेट्टी आणि बिपाशा बासू होते.
९)या चित्रपटात ऋषी कपूर, जुही चावला आणि अनिल कपूर होते.
११)अरविंद स्वामी आणि मधू अभिनीत चित्रपट.
१३) XXXXX संतोषी (निर्देशक)
१४) सन् १९९६ मध्ये ईस्माइल श्रॉफच्या निर्देशनात बनलेल्या या चित्रपटात सलमान खान, मनिषा कोईराला होते. १५)हम या चित्रपटात अमिताभ बच्चनची नायीका.
१८) सन् २००० मध्ये बनलेल्या या चित्रपटात जंगलचे संगीतकार.
२०) XXXX से कयामत तक (फिल्म) २३)सन् १९९३ मध्ये राजकुमार संतोषी निर्देशित या चित्रपटात ऋषी कपूर आणि मिनाक्षी शेषांद्री होते.२४) XX या पार (फिल्म) २५) सन् १९९५ मध्ये बनलेल्या फिल्म रंगीलामध्ये अमिर खानचे नांव.

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ह | म | तु | म्हा | रे | है | स | न | म | | | | ये |
| री | | षा | | खा | | ल | | | अ | नु | | रा |
| श | रा | र | त | | हे | मा | मा | लि | नी | | रा | स्ते |
| | | क | | | | न | | | ल | ज्ञा | | है |
| स | | पु | | अ | ली | खा | न | | | | | प्या |
| नी | | र | | मि | | न | | | अ | | आ | र |
| | ना | | | षा | | | चु | प | के | चु | प | के |
| रा | जा | की | | प | सी | ना | | | ला | | के | |
| ज | य | | | टे | | | जॉ | नी | | आ | दि | त्य |
| | ज | ति | न | ल | ली | त | | | | | ल | |
| ध | | स | | | | | | सं | | ह | मे | शा |
| में | | रा | ज | कु | मा | र | सं | तो | षी | | | न |
| द्र | | | | ली | | वी | | षी | | दि | ल | से |

### विनोद



एकदा अकबर बादशहाला तानसेनचे गुरु स्वामी हरिदास यांचे संगित ऐकण्याची संधी मिळाली. काही दिवसानंतर त्या सुखद क्षणाची आठवण करीत बादशहा तानसेनला म्हणाला, ''तानसेन, तुम्ही तर छानच गाता. पण तुमच्या गुरुच्या संगीताने मला जो आनंद झाला तसा आनंद तुमच्या गायनाने मला आजपर्यंत मिळालेला नाही.'' त्यावर तानसेन ताडकन म्हणाला, 'जहांपन्हा याचा मतलब स्पष्ट आहे. तो म्हणजे, माझे गुरुजी, आपल्या इच्छेने व खुशीने गात असतात. पण मला मात्र 'जहापन्हा' यांच्या हुकमाने गावे लागते।'

### चारोळी

आयुष्याची काही पानं
कोरीच ठेवायची असतात
जीवनातील अविस्मरणीय क्षण
त्यावर टिपायचे असतात.

# महापालिका गणेशोत्सव देखावा स्पर्धेत यंदा गड-किल्ल्यांचाही असणार समावेश

### विसर्जन मिरवणुकीच्या पारितोषिकांत वाढ; विविध देखाव्यांना देणार रोख पारितोषिके



महापालिकेच्या वतीने आयोजित गणेशोत्सव देखावा स्पर्धेच्या नियोजन बैठकीस उपस्थित महापौर ज्योती गाडे, महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप यांच्यासह अधिकारी व समिती सदस्य.

नगर – अहिल्यानगर मनपाच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सवानिमित्त सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. समाजप्रबोधन, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन तसेच विविध देखाव्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जतन व्हावे आणि गणेश मंडळांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेच्या नियोजनासाठी महापौर ज्योतीताई गाडे यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धा समितीची बैठक झाली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुत्केकर, महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप, बाळासाहेब बारस्कर, रोहन सानप, समिती सदस्य, अभिनेते श्रेणिक शिंगवी, गड-किल्ले अभ्यासक अभिजीत दरेकर, आर्किटेक्ट व चित्रकार अजय अपूर्वा, प्रसिद्धी विभाग व सांस्कृतिक विभाग प्रमुख शशिकांत नजन, क्रीडा अधिकारी फिलिप्स, लेखा निरीक्षक गणेश लईचेट्टी आदींसह समितीचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, यावर्षीपासून ऐतिहासिक देखावे या विषयामध्ये गड-किल्ल्यांच्या देखाव्याचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा समाजासमोर आणण्यास मदत होणार आहे.

गणेश विसर्जन मिरवणूक मराठमोळ्या पद्धतीने, आपल्या संस्कृतीचे जतन करणारी, समाजप्रबोधनपर, शिस्तबद्ध आणि पारंपरिक पद्धतीने काढणाऱ्या मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी यंदा पारितोषिकांच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. प्रथम पारितोषिक : १५ हजारांवरून २५ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक : १० हजारांवरून १५ हजार रुपये, तृतीय पारितोषिक : ७ हजारांवरून १० हजार रुपये अशी वाढ करण्यात आल्याची माहिती महापौर ज्योतीताई गाडे यांनी दिली.

सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धेतील समाजप्रबोधन देखावा या प्रकारात स्वच्छता अभियान, पर्यावरण संतुलन, पाणीबचत आदी विषयांवरील देखावे सादर करता येणार आहेत. तसेच व्यसनमुक्ती, प्लास्टिकमुक्ती, बेटी बचाव-बेटी पढाव, बालविवाह प्रतिबंध, जागतिक महामारी आदी विषयांवर जनजागृती करणाऱ्या देखाव्यांचाही स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे.या प्रकारातील उत्कृष्ट देखाव्यांना प्रथम क्रमांकासाठी २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी १५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी १० हजार रुपये अशी पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

ऐतिहासिक देखावा या प्रकारामध्ये यंदापासून गड-किल्ल्यांचा समावेश करण्यात आला असून, या प्रकारात प्रथम क्रमांकासाठी २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी १५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी १० हजार रुपये अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. धार्मिक व आध्यात्मिक देखावे या प्रकारात प्रथम क्रमांक २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक १५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांक १० हजार रुपये अशी पारितोषिके राहणार आहेत. तसेच जीवंत देखावे या स्पर्धेमध्ये सोशल मीडिया व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित देखाव्यांचाही समावेश करण्यात आला आहे. या प्रकारात प्रथम क्रमांकासाठी २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी १५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी १० हजार रुपये अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत.यावेळी पाहणी समितीच्या सदस्यांनी स्पर्धेच्या आयोजनाबाबत विविध सूचना मांडल्या.

गणेशोत्सवाच्या नियोजनानुसार १४ सप्टेंबर रोजी गणेश स्थापना होणार आहे. २१ सप्टेंबर रोजी गणेशोत्सव देखावा पाहणी करण्यात येणार असून, २२, २३ व २४ सप्टेंबर रोजी उपनगर व शहरातील विविध मंडळांच्या देखाव्यांची पाहणी केली जाणार आहे. तसेच २५ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन मिरवणुकीची पाहणी करण्यात येणार आहे.



## गुरुवाणी - ३२

### बंधन म्हणजे नात्याचे निर्माण...

'जब वस्तू का आश्रव होता है, तब कर्म का बंध होता है. जब व्यक्ती का आश्रव होता है तब रिश्तो का बंध होता है'. जो पदार्थ आपल्याला आवडतो, तो खाल्ल्यावर सहज पचतो. जो पदार्थ आवडत नाही, तो खाल्ल्यावर अपचन होते. व्यक्ती तुमच्या आयुष्यात नात्यांच्या रस्त्यावरूनच येतात. नाते मैत्रीचे असेल तर ते मैत्रीच घेऊन येईल. नाते शत्रुत्वाचे असेल तर जीवनात शत्रुत्वच येईल. जैनिझम मध्ये सुरूवातीला भाऊ बहिण अशा नात्याचा विचार नव्हता. ब्राम्ही व भरताचा जन्म बरोबर (जुळे) झाला आणि सुंदरी व बाहुबलीचा जन्म बरोबर झाला. पण झाले असं की सुंदरीचे मन भरताकडे तर ब्राम्हीचे मन बाहुबलीकडे आकृष्ट झाले. ते पहिले प्रेमी होते. पुढे भगवान ऋषभदेव केवल ज्ञानी झाले. तेव्हा उत्तराधिकारी झालेल्या भरताने वडीलांपेक्षा जास्त जगावर राज्य करण्याचा निर्धार केला. त्याला चक्रवर्ती बनायचं होतं. त्याला सुंदरीने प्रोत्साहन दिले. यादरम्यान ऋषभदेव नगरीत परतले. तेव्हा भरत पुत्र मरीची दीक्षा घेतो. सुंदरी व ब्राम्ही सुद्धा दीक्षा घेण्याचे ठरवतात. त्यांना भरत आणि बाहुबली विरोध करतात. भरताने मुलाला दीक्षेची परवानगी दिली पण सुंदरीला नाही दिली. यानंतर भरताने सहा खंड जिंकण्याची यात्रा सुरु केली. त्या दिवसापासून सुंदरीने आयंबिल सुरू केले. तब्बल ६० हजार आयंबिल तिने भरताच्या विजयासाठी केले. भरत चक्रवर्ती होऊन परत येतो तेव्हा त्याचे भव्य स्वागत होते. त्याला सुंदरीला भेटायची उत्कंठा असते. ती राजमहाल सोडून एका कुटीत राहत असते. आयंबिल करून तिचे शरीर कृश झाले होते पण तिच्या चेहऱ्यावर अद्भुत तेज आलेले असते. भरत तिला आवाज देतो. तेव्हा ती भरताला ' भ्राता (भाऊ)' म्हणून संबोधते आणि सुताचा एक धागा त्याच्या मनगटावर बांधते. म्हणूनच भारतीय संस्कृतीत 'विजय तिलक' लावण्याचा अधिकार केवळ बहिणीला आहे. यासाठीच रक्षा बंधन महत्त्वाचे आहे. बंधन म्हणजे बेडी नव्हे तर नात्याचे निर्माण करणे होय. स्वामी विवेकानंद शिकागो मध्ये सर्व धर्म परिषदेत बोलत असताना त्यांच्या तोंडातून सर्व प्रथम दोन शब्द बाहेर पडले, माझ्या प्रिय बंधू भगिनींनो हे ऐकून धर्मसभेत टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. या दोन शब्दांनी जादू केली होती. ही भारतीय संस्कृती आहे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# २८ ऑगस्टच्या मिरवणुकीत दिसणार कांतारा इफेक्ट

### वराहरूप, गुलिगा देव अन् भूतकोला नृत्याचा थरार



नगर – श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टच्या वतीने रक्षाबंधन व नारळी पौर्णिमेनिमित्त २८ ऑगस्ट रोजी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाच्या मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरणार आहे ते श्री एकदंत मित्र मंडळ व शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येणारे आगळेवेगळे सांस्कृतिक सादरीकरण. दरवर्षी नवनवीन संकल्पना सादर करणाऱ्या या दोन्ही संस्थांनी यंदा कांतारा चित्रपटातील भूतकोला परंपरेपासून प्रेरणा घेत विशेष कलाविष्कार साकारला आहे.

वराहरूप, गुलिगा देव आणि भूतकोला नृत्याचा थरारक आविष्कार कलाकारांच्या माध्यमातून सादर करण्यात येणार आहे. आकर्षक वेशभूषा, प्रभावी रंगभूषा, पारंपरिक नृत्यशैली आणि दमदार अभिनय यामुळे मिरवणुकीतील हे सादरीकरण प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. पारंपरिक लोककला आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अनोखा मिलाफ या सादरीकरणातून पाहायला मिळणार आहे.

या कलाविष्काराला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असून एलईडी स्क्रीन, आकर्षक दृश्यफिती आणि विशेष प्रकाशयोजनेमुळे कांतारा इफेक्ट अधिक प्रभावी ठरणार आहे. भूतकोला परंपरेतील वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा, नृत्य आणि भावमुद्रांचा थरार नगरच्या रस्त्यावर अनुभवता येणार असल्याने नगरकरांमध्ये या सादरीकरणाबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. मिरवणुकीचा प्रारंभ श्री मार्कंडेय मंदिर, गांधी मैदान येथून होणार असून चितळे रोड, चौपाटी कारंजा, दिल्ली गेट, जंगूभाई तालीम, नवरंग व्यायामशाळा, बागडपट्टी मार्गे पुन्हा श्री मार्कंडेय मंदिर असा मिरवणुकीचा मार्ग राहणार आहे.

कलाकारांनी या सादरीकरणासाठी विशेष मेहनत घेतली असून, पारंपरिक कलेला आधुनिक सादरीकरणाची जोड देत नगरकरांसमोर वेगळा अनुभव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या नागरिकांना हा कलाविष्कार नक्कीच लक्षवेधी ठरणार असून, कुटुंबासह उपस्थित राहून या कांतारा इफेक्टचा थरार अनुभवावा आणि कलाकारांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी श्री एकदंत मित्र मंडळ व शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठानचे ऋषीकेश सामल, ओंकार बुरगुल, अमर सादुल, यश सामल, माधव उडता, रोहन सामल, वरद अन्नलदास, ओंकार अन्नलदास, कार्तिक गज्ञम, शुभम कारामपुरी, महावीर कोंड्याल, साई सामल, आकाश हरबा, तनिष्क सिरसूल, शिवा कोंडा, गौरव कन्ना, विनीत इराबत्तीन, अक्षय बुरला, विपुल आडेप, तनिष्क कोंडा, ईश्वर कैरमकोंडा, वेदांत देशपांडे, बालाजी श्रीराम, दर्शन कैरमकोंडा, संतोष उषाकोयल, श्रीकांत गज्ञम आदी प्रयत्नशील आहेत.

# श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त मोफत तपासणी शिबीर

नगर – श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त सर्वज्ञ युवा सेवाभावी संस्था व राम एजन्सी, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने धोंडेवाडी (ता. नगर) येथील श्रीकृष्ण मंदिरात मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर ४ सप्टेंबर रोजी दुपारी १ ते सायंकाळी ५ या वेळेत होणार आहे.

दम्याचा त्रास, फुफ्फुसांशी संबंधित विकार तसेच श्वसनाच्या विविध समस्या असलेल्या नागरिकांसाठी हे शिबिर उपयुक्त ठरणार आहे. शिबिरात फुफ्फुसरोग तज्ज्ञ डॉ. हर्षल जे. गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत तपासणी व वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

शिबिरामध्ये पी.एफ.टी. (फुफ्फुसांची कार्यक्षमता) तपासणी मोफत करण्यात येणार असून, दम्याच्या पंपाचा योग्य पद्धतीने वापर कसा करावा, याबाबतही मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच सर्व रक्त तपासण्यांवर ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे.

हवामानातील बदलामुळे शिंका येणे, धुळीच्या संपर्कात आल्यानंतर खोकला येणे, सकाळी उठल्यानंतर कफ पडणे, छातीत घरघर किंवा चालताना-जिना चढताना दम लागणे, रात्री व पहाटे खोकला वाढणे तसेच कोरडा किंवा लवकर बरा न होणारा खोकला अशी लक्षणे असलेल्या नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या शिबिराचे आयोजन सर्वज्ञ बहुउद्देशीय विकास प्रतिष्ठान, वाळकी यांच्या वतीने करण्यात आले असून, श्रीकृष्ण मंदिर, धोंडेवाडी, वाळकी, येथे शिबिर होणार आहे.

# वीज पुरवठा खंडित झाल्याने शहरासह उपनगराचा पाणी पुरवठा विस्कळीत

नगर – शहर पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा २७ ऑगस्ट रोजी पहाटे खंडित झाल्याने शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगर भागास उशिराने व कमी दाबाने पाणी पुरवठा होणार असल्याची माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे.

अहिल्यानगर महापालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेकरिता विज पुरवठा होत असलेल्या विज वितरण कंपनीच्या एमआयडीसी उपकेंद्र येथील रामदास इस्पात कंपनीजवळ उच्च दाब वीज वाहिनीवर बिघाड निर्माण झाल्याने पहाटे/मध्यरात्री २.१५ वाजले पासून सकाळी ६ पर्यंत वीज पुरवठा खंडीत झालेला होता. सकाळी ६ वाजता वीज पुरवठा सुरू झालेनंतर मुळानगर, विळद येथून बंद पडलेला टप्या-टप्याने पाणी उपसा सुरू करण्यात येत असताना पुन्हा सकाळी ९.३० ते ९.३५ दरम्यान विज पुरवठा खंडीत झालेला आहे.

शहर पाणी पाणी वितरणासाठीच्या टाक्या भरण्याच्या कालावधीतच सलग चार तास विज पुरवठा खंडीत झाल्याने व विज पुरवठा सुरू झाल्यानंतर पूर्ण क्षमतेने पाणी उपसा सुरू होण्यास लागलेला अवधी विचारात घेता सलग ८ तास पाणी उपसा बंद राहिल्याने शहर पाणी वितरणाच्या टाक्या भरता आलेल्या नाहीत.

त्यामुळे २७ ऑगस्ट रोजी रोटेशन नुसार पाणी वाटपाच्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफखाना, दिल्लीगेट, नालेगाव, चितळे रोड, आनंदी बाजार, कापड बाजार, ख्रिस्त गल्ली, पंचपीर चावडी, जुने म न पा कार्यालय परिसर, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर, व सावेडी इत्यादी भागासह बोल्हेगाव, नागापूर, केडगांव, सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड लक्ष्मीनगर, तपोवनरोड, सुर्यनगर, निर्मलनगर परिसर इ. सर्व उपनगर भागास उशिराने व कमी दाबाने पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

तसेच पाणी वाटपाचे पाईपलाईन रोड संपुर्ण परीसर (डीमार्ट मॉल पासुन श्रीराम चौकापर्यतच्या) भागास पाणी पुरवठा होऊ शकणार नाही. सदरचा पाणी पुरवठा हा २८ ऑगस्ट रोजी करणेत येईल.

विज वितरण कंपनीकडुन होत असलेल्या विज पुरवठ्यामध्ये बिगाड निर्माण होवुन खंडीत विज पुरवठ्यामुळे दैनंदिन पाणी उपश्यामध्ये निर्माण झालेली वरील परिस्थिती विचारत घेता नागरीकानी याची नोंद घेवून असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करून महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रेमंडच्या चेअरमन कलेक्शनमुळे भारतीय फॅशन विश्वात नवा अध्याय

### कोहिनूरचे संचालक अश्विन गांधी यांनी घेतली सिंघानिया यांची भेट



रेमंड समूहाचे अध्यक्ष गौतम सिंघानिया यांच्यासोबत कोहिनूरचे संचालक अश्विन गांधी.

नगर – रेमंड समूहाचे अध्यक्ष गौतम सिंघानिया यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या चेअरमन कलेक्शन या नव्या फॅशन ब्रँडने भारतीय फॅशन विश्वात नवा अध्याय सुरू केला आहे. मुंबईतील वांद्रे येथे सुरू झालेल्या या नव्या स्टोअरमधून भारतीय फॅशनला आंतरराष्ट्रीय दर्जाची ओळख मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अहिल्यानगर येथील कोहिनूर वस्त्रदालनाचे संचालक अश्विन गांधी यांनी मुंबईत या स्टोरला भेट दिली. तसेच गौतम सिंघानिया यांच्यासोबत झालेल्या एका विशेष स्नेहभोजनाच्या निमित्ताने त्यांच्या दूरदृष्टीची आणि फॅशन क्षेत्रातील उत्कटतेची जवळून अनुभूती घेतली.

याविषयी माहिती देताना अश्विन गांधी यांनी सांगितले, गौतम सिंघानिया यांच्याशी झालेला संवाद अनुभव विश्व व्यापक करणारा ठरला. भारतीय ग्राहकांना जागतिक दर्जाचे, उच्च फॅशनचे कपडे उत्कृष्ट डिझाइन, दर्जा आणि फिनिशिंगसह उपलब्ध करून देणे, हे चेअरमन कलेक्शनमागील प्रमुख उद्दिष्ट आहे.

विशेष म्हणजे, आंतरराष्ट्रीय लक्झरी ब्रँड्समध्ये सुमारे १,५०० युरोमध्ये मिळणाऱ्या उत्पादनांच्या तोडीची फॅशन सुमारे ३०० युरोच्या किमतीत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न ही या संकल्पनेची सर्वात आकर्षक बाजू आहे. गुणवत्ता, कारागिरी आणि फिनिशिंगमध्ये कोणतीही तडजोड न करता लक्झरी फॅशन अधिक व्यापक ग्राहकवर्गापर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.

गौतम सिंघानिया स्वतः मोनॅकोसह जगभरातील प्रतिष्ठित ठिकाणी आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये चेअरमन कलेक्शनमधील पोशाख परिधान करताना दिसले आहेत. या कलेक्शनची शैली आणि दर्जा पाहता ते इटलीतील नामांकित लक्झरी ब्रँड्सच्या तोडीचे असल्याची भावना निर्माण होते.

चेअरमन कलेक्शनच्या निमित्ताने २००३ मधील एक आठवणही जागी होते. लंडनच्या हिथ्रो विमानतळावर गौतम सिंघानिया यांची भेट झाली होती. त्यावेळी त्यांनी लाल पट्टे आणि आकर्षक पांढऱ्या स्टिचिंगसह डेनिम परिधान केले होते. त्या वेगळ्या स्टाइलने त्यावेळी विशेष लक्ष वेधून घेतले होते. आज त्याच प्रकारची नावीन्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण फॅशन अधिक मोठ्या ग्राहकवर्गासाठी उपलब्ध करून देण्याचे काम चेअरमन कलेक्शनच्या माध्यमातून होत आहे.

भारतीय फॅशन आणि रिटेल क्षेत्राशी संबंधित व्यक्ती म्हणून, एका भारतीय उद्योजकाने जागतिक दर्जाची फॅशन निर्माण करून आंतरराष्ट्रीय लक्झरी ब्रँड्ससमोर आत्मविश्वासाने भारतीय ब्रँड उभा करण्याचे घेतलेले आव्हान निश्चितच अभिमानास्पद आहे. लंडनमधील मेफेअर किंवा नाईट्सब्रिजसारख्या प्रतिष्ठित भागात चेअरमन कलेक्शनचे स्टोअर उभे राहावे, ही कल्पनाच भारतीय फॅशन उद्योगासाठी अभिमानाची बाब ठरेल. भारतीय फॅशनला जागतिक व्यासपीठावर नवी ओळख मिळवून देण्याच्या या महत्त्वाकांक्षी प्रवासासाठी गौतम सिंघानिया आणि रेमंडच्या संपूर्ण टीमला कोहिनूर परिवारातर्फे मनःपूर्वक शुभेच्छा.

# अहिल्यानगर फॅशन रनवेचा ३० ऑगस्ट रोजी मेगा इव्हेंट; संस्कृती, परंपरा, आधुनिकता, स्त्रीशक्तीचा अनोखा संगम

नगर – अहिल्यानगरच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा गौरव, महिला सक्षमीकरण, आत्मविश्वास आणि स्त्रीशक्तीचा जागर करण्याच्या उद्देशाने आयोजित अहिल्या सरस्वती महोत्सव २०२६ अंतर्गत ३० ऑगस्ट रोजी अहिल्यानगर फॅशन रनवे या मेगा इव्हेंटचे आयोजन करण्यात आले आहे. नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्स येथे दुपारी २.३० वाजता हा कार्यक्रम रंगणार असून, नगरच्या सांस्कृतिक आणि फॅशन विश्वात नवा आयाम निर्माण करणारा हा सोहळा ठरणार आहे.

सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या पुढाकाराने आणि महावीर ग्रुपचे (राजेश भंडारी) टायटल स्पॉन्सरशिप लाभलेल्या या कार्यक्रमाचे संचालन फॅशन कार्निवलच्या वतीने कल्लाकार कट्टा टीम करीत आहे. मागील महिनाभरापासून या कार्यक्रमाची जोरदार तयारी सुरू असून, नगरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता दोन टप्प्यांत ऑडिशन घेऊन मेगा इव्हेंटसाठी सहभागींची निवड करण्यात आली आहे. स्पर्धकांसह सुमारे ५०० जणांचा सहभाग या कार्यक्रमात राहणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांचा आणि देदीप्यमान कार्याचा जागर करतानाच महिला शक्तीचा गौरव करणारा हा महोत्सव ठरणार आहे. फॅशन रनवेच्या माध्यमातून विविध क्षेत्रांतील महिलांना आपला आत्मविश्वास, प्रतिभा आणि सक्षमता सादर करण्यासाठी भव्य व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. मेगा इव्हेंटमध्ये अहिल्या गौरव पुरस्कार आणि सरस्वती गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

त्याचबरोबर बहुप्रतीक्षित प्रेग्नेंट लेडी वॉक, डॉक्टर्स वॉक, पॅरेंट अँण्ड मी वॉक, डिझायनर फॅशन सिक्वेन्स, अहिल्यादेवींच्या विचारांवर आधारित थीम, पारंपरिक मराठमोळी नऊवारी साडी व अलंकारांचा साज असे विविध आकर्षक सिक्वेन्स सादर केले जाणार आहेत. आई आणि तिचे बाळ, आई आणि मुलगी या नात्यांचा भावनिक बंध अधोरेखित करणाऱ्या वॉकसोबतच रुग्णसेवेत योगदान देणाऱ्या डॉक्टरांनाही फॅशन रनवेच्या माध्यमातून एक वेगळे व्यासपीठ मिळणार आहे. आधुनिक फॅशन ट्रेंडसोबतच महाराष्ट्राच्या संस्कृती आणि परंपरेचे दर्शन या कार्यक्रमातून घडणार आहे.

कार्यक्रमातील प्रत्येक सिक्वेन्ससाठी सहभागींची विशेष तयारी करून घेण्यात आली आहे. वेशभूषा, आभूषणे, फॅशन स्टाइलिंग तसेच रॅम्प वॉकसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळाले आहे. त्यामुळे महानगरांमध्ये पाहायला मिळणारा फॅशनचा भव्य सोहळा नगरकरांना यंदा आपल्या शहरात प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे.

महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा विशेष नृत्य-नाट्य आविष्कारही यावेळी सादर केला जाणार आहे. संस्कृती, टॅलेंट, फॅशन, सक्षमीकरण, आरोग्य, मनोरंजन आणि पुरस्कार यांचा सुरेख संगम असलेला हा महोत्सव अहिल्यानगरकरांसाठी एक अविस्मरणीय पर्वणी ठरणार आहे. कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून, एंट्री पास सरस्वती हॉस्पिटल, माळीवाडा येथे उपलब्ध आहेत. नगरकरांनी उपस्थित राहून सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# भिंगारच्या महानुभाव पंथाचे मंदिरात 'पविते पर्व कार्यक्रमास' सुरुवात



भिंगारमधील महानुभाव मंदिरात भगवान श्री चक्रधर स्वामींच्या महास्थानास पवित्र पविते अर्पण करताना दिपक कुमार अँण्ड सन्सचे संचालक नंदलाल उरणकर व सौ.ज्योती उरणकर. समवेत प.पू सुदामराज बिडकरबाबा, दगडूशेठ उरणकर आदी.

नगर – जय जय गोविंद जय जय गोविंदच्या नामघोषात भिंगारच्या महानुभाव पंथाचे मंदिरात पविते पर्व कार्यक्रमास मोठ्या भक्तिभावाने सुरुवात झाली.येथील श्री चक्रधर स्वामींच्या पवित्र महास्थानास नगरमधील दिपक कुमार अँण्ड सन्सचे संचालक नंदलाल उरणकर आणि सौ. ज्योती उरणकर यांच्या हस्ते श्रध्देने पविते अर्पण करण्यात आले.यानंतर भाविकांनी आपले पविते महास्थानास अर्पण केले.

प.पू.सुदामराज बिडकर यांच्या हस्ते भगवान श्री चक्रधर स्वामींच्या पवित्र महास्थानास पहाटे चंदनाउटी अभिषेक करण्यात आला.सायंकाळी ६ वा भगवद्गीतेतील अध्याय म्हणण्यात आले. पविते पर्व आणि भगवान चक्रधर स्वामींची महाआरती आणि प्रसाद वाटप करण्यात आले. याप्रसंगी दगडू उरणकर आणि कुटुंबीय तसेच महानुभाव पंथाचे अनुयायी व अन्य भाविक उपस्थित होते प्रसाद वाघ यांनी स्वागत केले. महानुभाव पंथात पविते पर्व हा गुरुपूजन आणि आराधनेचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र सण मानला जातो.

या पर्वकाळात भाविक सर्वप्रथम परमेश्वराला म्हणजेच भगवान चक्रधर स्वामींना आणि नंतर गुरुंना सुताने गुंफलेले, आकर्षक सजविलेले नारळ व सुपारी अर्पण करतात.विडा अवसर या धार्मिक विधिसमयी 'गोविंद.. गोविंद' असा नामघोष केला जातो आणि देवासमोर विडा व पविते अर्पण करण्याची परंपरा आहे. ही शेकडो वर्षे जुनी परंपरा असून बीड येथील मंदिरातून सुरुवात झाली आहे. या मंदिरात श्रावण शुद्ध चतुर्दशीला भगवान चक्रधर स्वामींना भक्तांनी पविते अर्पण केले. तेव्हापासून ही प्रथा सुरु झाली आहे. भारतातील महानुभाव पंथीय मंदिरे व चरणांकित स्थानांवर पविते अर्पण केली जातात.

# बालकांवरील लैंगिक अत्याचाराला आळा घालण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांना पोस्को कायद्याबाबत मार्गदर्शन

नगर – बालकांवरील लैंगिक अत्याचाराला आळा घालण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्कांची आणि कायदेशीर संरक्षणाची माहिती मिळावी, या उद्देशाने मदत सोशल फाउंडेशनच्या अंतर्गत पोस्को ॲक्ट २०१२ संदर्भात जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

ॲड. मोनाश्री अहिरे (शिंदे) यांनी संत तुकाराम माध्यमिक आश्रमशाळा, आल्हणवाडी (ता. पाथर्डी) तसेच न्यू इंग्लिश स्कूल, पाथर्डी येथील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बालकांवरील लैंगिक अत्याचाराची विविध रूपे, पोस्को कायद्यातील तरतुदी, बालकांचे कायदेशीर हक्क, सुरक्षित वर्तन तसेच कोणतीही अनुचित घटना घडल्यास विश्वासू व्यक्ती, शिक्षक किंवा संबंधित यंत्रणेशी संपर्क साधण्याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. यावेळी शाळेचे पदाधिकारी, मदत सोशल फाउंडेशनचे कार्यवाहक श्रीधर शेलार तसेच अँड. शितल डमाळे उपस्थित होते.

